श्री

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



द्वारकामाईतील श्री साईबाबा

जुलै १९८१ ] [ किंमत १ रु.

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक


: संपादक :
**श्री.क.हि.काकरे**
रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

**डॉ.श्री.दि.परचुरे**
एम. ए. पी. एच. डी.
(इंग्रजी आवृत्ती)

**श्री.सदानंद चेंदवणकर**
(मराठी आवृत्ती)


**श्रीसाई वाक्सुधा**


वर्ष ६० वे) किंमत एक रुपया (अंक ४ था

जुलै १९८१
गुरुपौर्णिमा विशेषांक

: कार्यालय :
"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.
दूरध्वनी : ४४३३६१
वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



# श्रीसाई वाक्सुधा

आधीं मज न दिधल्यावांचून ।
करितां भोजन–रस प्राशन ।
जया माझें हें निदिध्यासन ।
तया आधीन मी वर्ते ॥१५२॥


माझीच जया भूक तहान ।
दुजें न ज्यातें मजसमान ।
तयाचेंच मज नित्य ध्यान ।
तया आधीन मी वर्ते ॥१५३॥

पिता माता गणगोत ।
आप्तइष्ट कांता सुत ।
यां पासाव जो परावृत्त ।
तोचि कीं अनुरक्त मत्पदीं ॥१५४॥

वर्षा काळीं नाना सरिता ।
महापूर समुद्रा मिळतां ।
विसरती सरितापणाची वार्ता ।
महासागरा पावती ॥१५५॥

रूप गेलें नामगेलें ।
जळही जाऊनि सागरीं मिसळलें ।
सरिता–सागर लग्न लागलें ।
द्वैत हारपलें एकत्वीं ॥१५६॥

—श्रीसाईसच्चरित–अध्याय ४४ वा



जे जे पदार्थ पूजेचे ।
ते ते तुमच्या आत्म्याचे ।
अंश आधीच असती साचे ।
श्रीसमर्था गुरुराया ॥

# अनुक्रमणिका जुलै १९८१


| | |
|---|---|
| १) संपादकीय | – गुरुपौर्णिमा अथवा व्यासपौर्णिमा |
| २) श्रीसंत जयरामबाबा | – |
| ३) मुखपृष्ठावरील चित्राची रंजक कथा | – |
| ४) दिल्लीचे परम साईभक्त श्री. आर. एस. चिटणीस | – साईनंद |
| ५) श्रीसाईबाबांचे गुरुस्थान | – सदानंद चेंदवणकर |
| ६) गुरु महिमा | – |
| ७) श्रीसद्गुरवे नमः | – |
| ८) बाबांचे गुरु-गोपाळराज केशवराज महाराज | – |
| ९) श्रीसद्गुरु स्तवन हेच सर्वोत्कृष्ट पूजन | – प्रा. र. श्री. पुजारी |
| १०) गुरुबद्दल स्वतः साईबाबा काय म्हणतात | – श्री. अनंत पै काणे |
| ११) श्री सद्गुरु दर्शन | – श्री. र. शं. बुजरकर |
| १२) साग्यार्क | – श्री. पां. वा. भुतकर |
| १३) शिरडी वृत्त | – मे १९८१ |
| १४) श्री नारायणबाबांची युरोपयात्रा | – |
| १५) श्रीसाईगीत तुषार १५ व १६ | – श्री. सुहास देसाई |
| १६) लागन ध्यान शिरडीले | – सौ. लीला डी. मराठे |
| १७) चैतन्याचा पुतळा, तुज वंदूरे गुरुदत्ता | – सौ. आशा इंगळे |
| १८) गुरुपौर्णिमा | – सौ. शशिकला रेवणकर |
| १९) दिव्य शिळेवर शिरडी ग्रामी | – सौ. पार्वती म. भिडे |
| २०) साईबाबा कृपा करी रे | – सौ. पद्मा नडवे |
| २१) संत फकीर | – कु. शशिकला साळगावकर |
| २२) मागणे | – श्री. डी. बी. पोतनीस |
| २३) जगाच्या कल्याणा साईनाथा | – श्री. प्र. अ. पुराणिक |
| २४) धाव घेई गुरुनाथा | – सौ. तारा चेंदवणकर |
| २५) अवतारी बाबा | – डॉ. उमेश केळकर |
| २६) खेळविती साई तसा मी खेळतो | – श्री. म. पां. भावे |
| २७) साईचरणी प्रणाम | – डॉ. ग. स. कामत |
| २८) दारी वासुदेव साई | – सौ. शकुंतला जगतकर |
| २९) दत्तगुरु तुम्ही पावन केले | – श्री. अजित एम. पावसकर |
| ३०) उजळील अमुच्या जीवनज्योती | – श्री. विनायक पाठक |

# गुरुपौर्णिमा अथवा व्यासपौर्णिमा

● व्यासपौर्णिमेला गुरुपौर्णिमा असेही म्हटले जाते. कारण व्यास आणि गुरु या दोन गोष्टी अविभाज्य आहेत. या दिवशी महर्षि वेदव्यासांचे स्मरण करून त्यांचे कर्तृत्व समजून घेणे अतिशय आवश्यक आहे.




व्यास या शब्दाची व्याख्या अगदी साधी, सोपी नि सुटसुटीत आहे. ती अशी विव्यास वेदान् स व्यासः । ज्याने वेदांचा विस्तार केला.-वेद स्पष्ट केले तो व्यास होय. वेद ग्रंथ हे आपणाला अगदी प्रमाणभूत ग्रंथ वाटतात. त्यामुळे महर्षि व्यासांना वेदव्यास असे जे म्हटले जाते ते उचित होय. त्यामुळे व्यासांना परमगुरु समजले जाते आणि म्हणून व्यासांविषयी अथवा पर्यायाने गुरुविषयी आदर व्यक्त करणे हे प्रत्येक भारतीयाचे आद्य कर्तव्य ठरते.

भारतीय संस्कृतीत मनुष्याचे तीन गुरु मानले जातात. माता, पिता व गुरु-शिक्षक म्हणूनच तैतिरीयोपनिषदात मातृदेवो भव, पितृदेवो भव यानंतर आचार्यदेवो भव असा स्नातकाळी उपदेश करण्यात येतो. आचार्य अथवा गुरु हा ज्ञानाकडे नेणारा शॉर्टकट होय. म्हणूनच गुरुमाहात्म्य भारतीय संस्कृतीत अनन्यसाधारण आहे. त्याचप्रमाणे 'गुरुमुखात विद्या' असेही सांगितले आहे. म्हणजेच विद्या ही गुरुमुखातूनच ग्रहण-श्रवण केली पाहिजे. साधी गोष्ट आहे. छापण्याची कला अस्तित्वात आल्यानंतर कुठल्याही विषयावर शेकडो हजारो ग्रंथ या शतकात निर्माण होताहेत. टीका, टिप्पणी, प्रतिटीका, भाष्ये, शब्दकोश वगैरे एखाद्या विषयावर इतक्या विपुल प्रमाणावर निर्माण होऊनसुद्धा मनुष्य पुस्तके, ग्रंथ, टीका, भाष्ये वाचून विद्वान होऊ शकत नाही. तर त्या त्या विषयाचे विवरण गुरुच्या तोंडून ऐकल्यावरच त्याचा संशयनिरास होऊन त्यांना ज्ञानप्राप्ति होते. तसे नसते तर शाळा कॉलेजांची आवश्यकता न राहाता केवळ ग्रंथालये राहिली असती तरी चालले असते. पण तसे होत नसते. एवढं सगळं असूनसुद्धा गुरुची आवश्यकता तितक्याच प्रमाणावर विद्यार्थ्याला लागते. मनुचा दाखला देऊन बोलायचे झाले तर असे म्हणता येईल की मूर्तिकार जसा ओबडधोबड दगडातून सुरेख मूर्ति बनवतो तसा गुरु हा अविकसित शिष्याला विकासोन्मुख बनवतो. म्हणून गुरु हा पित्यासमान-पित्यासारखाच समजला

जातो. 'तूच आमचा पिता, तूच आम्हाला अविद्येच्या परतीराला घेऊन जातोस. त्या श्रेष्ठ ऋषींना नमस्कार असो।' ('त्वं हि नः पिता यः अस्माकं अविद्यायाः परं पारं तारयसि। नमः परमऋषिभ्यः नमः परमऋषिभ्यः।') ॲरिस्टॉटलने तर गुरुला जन्मदात्या पित्यापेक्षाही श्रेष्ठ ठरवले आहे. तो म्हणतो—'जन्मदाता मला जन्म देऊन स्वर्गातून पृथ्वीवर आणतो तर गुरु हा ज्ञानदानाने मला पृथ्वीवरून स्वर्गाप्रत घेऊन जातो.'

उपनिषदात तर म्हटले आहे की, 'आचार्यवान् पुरुषो वेद।' ज्याला गुरु प्राप्त झाला आहे त्याला खरेच ज्ञान मिळते.

तेव्हा भावार्थ असा आहे की गुरु या संस्थेला आदराने वागवण्यात यावे. प्राचीन भारतातील गुरुशिष्यसंबंध हे अतिशय जिव्हाळ्याचे होते. प्रेमाचे, मैत्रीचे होते. याबाबतीत पतंजलीने व्याकरणमहाभाष्यात पहिल्या आन्हिकात म्हटले आहे—'तदेवं विप्रतिपन्न बुद्धिभ्योऽध्येतृभ्यः सुहृद्भूत्वा आचार्य इदं शास्त्र मन्याचष्टे।' याचा भावार्थ असा की—'तेव्हा अशा प्रकारे बुद्धीत संभ्रम निर्माण झालेल्या विद्यार्थ्यांना आचार्य, त्यांचा मित्र होऊन, हे शास्त्र शिकवतो.' यावरूनच प्राचीन गुरु-शिष्य संबंधावर प्रकाश पडतो.

आणि व्यास हे तर परमगुरु असल्याने त्यांच्याविषयी आदर दर्शवणे अथवा त्यांची पूजा करणे म्हणजेच पर्यायाने गुरु या संस्थेची पूजा करणे अथवा त्याविषयी आदर दर्शवणे होय.

व्यास ही खरोखर एक व्यक्ति होती की संस्था होती याविषयी संभ्रम निर्माण व्हावा इतके व्यासांचे कर्तृत्व अफाट आहे. वेदच नव्हे तर संपूर्ण महाभारत ग्रंथही व्यासांनी लिहिला आहे व महाभारत ग्रंथ हा जगातील शहाणपणाचा गड्डा होय. म्हणूनच व्यासांना उद्देशून पुढील प्रार्थना नेहमी म्हटली जाते—

'नमोऽस्तु ते व्यास विशालबुद्धे फुल्लारविन्दायतपत्रनेत्र।
येन त्वया भारततैलपूर्णः प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः॥

या श्लोकाचा प्रार्थनेचा सरलार्थ असा—

'ज्यान महाभारतरूपी तेलाने पूर्ण भरलेला असा ज्ञानमय प्रदीप उजळून प्रज्वलित केला आणि विकसित कमळाप्रमाणे ज्याचे नेत्र विशाल आहेत आणि ज्याची बुद्धि विशाल आहे अशा व्यासऋषे, तुला नमस्कार असो!'

महाभारतामध्ये सगळे जग सामावलेले आहे. महाभारतात जे आहे तेच बाहेर इतरत्र आढळेल. महाभारतात जे नाही ते इतरत्र कोठेही उपलब्ध होणार नाही असा दावा सार्थ आहे. ( यदिहास्ति तदन्यत्र यन्नेहास्ति न तत्क्वचित् ) आणि म्हणूनच व्यासांना उद्देशून ' व्यासोच्छिष्टं जगत् सर्वम् ' असे यथार्थतेने म्हटले जाते.

म्हणूनच व्यासपौर्णिमेच्या निमित्ताने भारतीय संस्कृति गुरुसंस्थेचा आदर करते गुरुसंस्था ही त्रिकालाबाधित असून सर्वश्रेष्ठ होय. हेच यानिमित्ताने मनावर ठसवले जावे हाच या गुरुपौर्णिमेचा उद्देश होय. म्हणून पुढील श्लोकाने या संपादकीयाचा समारोप करतो—

" गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः। गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः॥"

# श्रीगुरुपौर्णिमा उत्सव

प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही श्रीगुरुपौर्णिमा उत्सव श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी तर्फे श्रीक्षेत्र शिर्डी येथे दिनांक १६–१७–१८ जुलै १९८१ रोजी साजरा होत आहे तरी सर्व श्रीसाईभक्तांनी हेच निमंत्रण समजून संपूर्ण कार्यक्रमास हजर राहून सर्वतोपरीने संस्थानला सहकार्य द्यावे अशी विनंती मे. कोर्टरिसिव्हर-साहेब श्री साईबाबा संस्थान शिर्डी हे करतात.

## दादर येथे उत्सव

श्रीसाईबाबा संस्थान शिरडीच्या दादर येथील श्रीसाईनिकेतन ८०४ बी डॉ. आंबेडकर मार्ग येथील कार्यालयात गुरुपौर्णिमा उत्सव शुक्रवार दिनांक १७ जुलै १९८१ रोजी साजरा केला जाईल. ठीक दुपारी १२ वा. आरती होईल. तरी भक्तांनी दर्शन-प्रसादास यावे ही विनंती.

पुण्यतिथी निमित्य खास लेख—

अकोला-अमरावतीचे थोर संत

# श्री संत जयराम बाबा

● श्री संत जयराम बाबा यांचे वडील राणोजी रेवाळे अमरावती जिल्ह्यातील अचलपुर शहरात सुलतानपुऱ्यात राहात होते. इ. स. १८६६ च्या वैशाख महिन्यात श्री बाबांचा जन्म झाला. त्यांच्या आईचे नाव बायजाबाई असे होते. घरची गरीबी असल्यामुळे रेवाळे कुटुंब सुर्जी अंजनगावला आले. तेथे प्राथमिक शाळेत श्री बाबा शिकू लागले. परंतु पुस्तके व फी साठी पुरेसे पैसे नसल्यामुळे बाबांना बालवयात शाळा सोडावी लागली. बाबांची अंगकाठी लहानपणापासूनच मजबूत होती. त्यांनी कुस्त्या खेळून आपले शरीर कमावले होते. बाबांच्या वयाच्या चौदाव्या वर्षी रेवाळे कुटुंब अंजनगाव सोडून अकोला जिल्ह्यातील पातुर जवळील विवरे या गावी आले. तेथे मोलमजुरी करून त्यांनी काळ कंठला.

श्री बाबांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होऊ शकले नाही. तरी त्यांनी अभंग वाङ्मयाचा अभ्यास करून केला. पोथी ऐकण्याची आवड असल्यामुळे पांडवप्रताप, रामायण, काशीखंड इत्यादी ग्रंथातील गोष्टी त्यांनी केवळ श्रवणाने आत्मसात केल्या.

त्यांचे लग्न वयाच्या विसाव्या वर्षी जनाबाईशी झाले. त्यांना तुकाराम व नामदेव नावाची दोन अपत्ये झाली. लग्न त्यांना भाग्याचे लाभले. लाथ मारीन तेथे पाणी काढीन अशा आत्मविश्वासाने त्यांनी आरंभी मोल-मजुरी करून पुढे पिढीजात तागाचा धंदा सुरू केला. तागाचा धंदा करणाऱ्यांना भामटी असे म्हणतात. या धंद्यात श्री बाबांनी खूप कमाई करून घर बांधून शेती विकत घेतली.

## 'गजानन महाराजांचा प्रसाद'

'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे ! उदास विचारे वेच करी ।' या तुकोबांच्या उक्तीप्रमाणे श्री बाबा गृहस्थी जीवन जगू लागले.

इ. स. १९१० च्या सुमारास एके दिवशी श्री बाबांनी आपली तागाची गाडी घेऊन अकोल्याला प्रयाण केले. कर्म धर्म संयोगाने त्याच दिवशी शेगावचे सुप्रसिद्ध श्री गजानन महाराज खटाऊ नावाच्या एका धनिकाच्या बंगल्यावर उतरले होते. या (विदेही) पुरुषाचे दर्शन घ्यावे म्हणून श्री बाबा बाजारातून बंगल्यावर आले. त्यावेळी गजानन महाराजांच्या कुत्र्याने श्री बाबांना अडविण्याचा प्रयत्न केला. ते

पाहून श्री गजानन महाराजांनी कुत्रे आवरले. त्यामुळे श्री बाबा या विदेही पुरुषाचे दर्शन त्यांचे जवळ बसून घेऊ शकले. श्री गजानन महाराजांचे सेवक श्री भास्करराव पाटील यांनी श्री गजानन महाराजांना भोजनाचे ताट आणले. महाराजांनी थोडे तोंड उष्टे करून श्री बाबांना उच्छिष्टाचे भोजन घातले. तोच श्री बाबांना मिळालेला गुरुप्रसाद होय.

यावेळेपासून श्री बाबांच्या वृत्तीत पालट झाला. त्यांना एकांतवास अधिक आवडू लागला. ते पुनश्च श्री गजानन महाराजांच्या भेटीला शेगावला गेले. पुढे काही दिवसानंतर त्यांचे पहिले कुटुंब व वडील वारले. घरात फक्त दोन मुले व आई एवढीच माणसे राहिली. त्यांचे मन संसारात रमेना. पण एका सत्पुरुषाच्या आज्ञेने त्यांनी पुनश्च विवाह केला. आज अमरावतीस ज्ञानदेव आश्रमात हयात असलेली जनाबाई ऊर्फ द्रौपदीबाई हीच त्यांची द्वितीय पत्नी होय.

द्वितीय विवाहोत्तर घरातील सापत्न भाव वाढत गेल्यामुळे वैतागून श्री बाबा चिखलगावजवळच्या डोंगरात विहार करू लागले. याच काळात त्यांनी ज्ञानेश्वरीचे पारायण व ध्यान धारणेचा अभ्यास केला. तेथून लवकरच श्री बाबा अमरावती जिल्ह्यातील सातपुडा पर्वतातील मुक्तागिरी येथे आले. तेथे उभयता पतीपत्नींनी झाडाचा पाला व कंदमुळे खाऊन आपली भूक भागविली.

पुढे ते करजगावच्या जंगलात आले. आसपासच्या भक्तांची जाऊयेई व्हायला लागली. महाराजांना वारकरी खोल टाळ वाजविण्याचा नाद होता. लोक त्यांची कथाकीर्तने करवीत. १९४५ सालची गोष्ट. अमरावतीनजीक नया अकोला नावाचे एक गाव आहे. तेथे चातुर्मास उत्सव चालू होता. त्यानिमित्त महाराजांना कथाकीर्तन करण्याचे आमंत्रण आले. त्यांच्या वऱ्हाडी वाणीतील कथाकीर्तनाची कीर्ति परिसरात पसरली. परिणामतः अमरावतीकर कथाकारांनी त्यांना अमरावतीस प्रथमच आणले. तेथील एकवीरा देवी व नारायणाच्या मंदिरात एक महिनाभर त्यांची ज्ञानेश्वरी व वाक्यवृत्तीवरील विवेचन प्रवचने सर्वतोमुखी झाली. त्यांच्या आध्यात्मिक अनुभवामुळे त्यांच्या वऱ्हाडी वाणीने विद्वानांनाही वेड लावले. स्वातंत्र्योत्तर काळात प्राचार्य सोनोपंत दांडेकरांची ज्ञानेश्वरी प्रवचने अमरावतीस आयोजित करण्यात आली होती. महाराज मधून मधून त्यांच्या प्रवचनास जाऊन त्यांच्या प्रतिपाद्य ओवीच्या आध्यात्मिक अंतरंगात शिरून स्वतःशीच टीकाटिप्पणीही करीत. दांडेकरांनी नम्रतेने त्यांचेकडे जाऊन त्याची दखलही घेतली. असा आगळा आध्यात्मिक अधिकार होता या वऱ्हाडीबाबाचा. स्वातंत्र्याच्या उषःकाली अमरावतीहून आळंदीस येऊन चातुर्मास करून महाराजांनी महिना दोन महिने मुंबईसही मुक्काम केला. मुंबईकरांनाही त्यांच्या वऱ्हाडीवाणीने वेड लावले.

मुंबापुरीहून अंबापुरीस परतल्यावर अमरावती शहराबाहेर स्मशानासमोरील शेतात त्यांनी आपला आश्रम थाटला. कष्टाची कास्तकारी कामे करून त्यांनी टुमदार शेत विकत घेतले. तेथे त्यांनी ज्ञानदेवाश्रम बांधला. ज्ञानदेवांच्या पुण्यस्मरणार्थ प्रति वर्षी उत्सव सुरू केला. आश्रम आजही आहे. तेथे महाराजांच्या मूर्तीचे शिल्प आहे.

आळंदीस असताना आपली ओळख न देता ते सुप्रसिद्ध साखरे महाराजांच्या आश्रमातील शेतीची कामे करू लागले. त्यावेळी श्री. मोडक मठाधिपती होते. आश्रमात ज्ञानेश्वरीचे पठन पाठन चाले. बुद्धिमान लोक चर्चा करून अर्थनिश्चिती करीत. महाराज मुकाट्याने ती ऐकत असत. एकदा ॐ या पदावर भवति न भवति झाली. आंतरिक अर्थनिष्पत्तीच्या दृष्टीने ऊहापोह झाला. श्री बाबांना साहवले नाही, राहवले नाही. त्यांनी तात्काळ अर्थबोध केला. या वेड्यावाकड्या वऱ्हाडी बाबाची वाणी अंतरंगात शिरून ॐ चे गुह्य उकलत गेली. मठाधिपती मोडकासहित सारेच चपापले. मोडकांनी मन मोठे करून महाराजांना आपल्या विद्वज्जनपूनित व्यासपीठावर बसविले. परिणामतः एक महिनाभर हा मराठमोळा वऱ्हाडी बाबा आपल्या अधिकारवाणीने ज्ञानेश्वराचे गुह्य प्रगट बोलू लागला. वेष असावा बावळा अंतरी असाव्या नाना कळा.

१९४८ सालची गोष्ट. जानेवारी महिना होता तो. वर्धा जिल्ह्यात देवळीला श्री बाबांचे कीर्तन प्रवचन आयोजित करण्यात आले होते. त्यासाठी श्री बाबा आपल्या ज्येष्ठ व श्रेष्ठ अनुयायासह आगगाडीने प्रथम पुलगावला आले. वेळ सकाळची होती पुढचा प्रवास पायदळीचा. वाटेत आडवा आला नाला. महाराज वायदा पटविण्यासाठी नाल्याच्या काठी आले. तोच काही दुश्चिन्हे दिसू लागून महाराज मोठ्याने ओरडले व रडले. शेजारील शिष्यवरांना याचा काहीच बोध झाला नाही. दुपारी देवळीतील देवळात प्रभावी प्रवचन झाले. संकेताप्रमाणे सायंकाळी पाचनंतर म. गांधी पंचतत्वात विलीन झाल्याची आकाशवाणी झाली. सारा समाज हळहळला. या दुःखद घटनेची नांदी म्हणजे महाराजांची सकाळची आर्त अवस्था होती असे आता शिष्यवरांना उमगले. महाराजांच्या दिव्य दृष्टीला दूरचे दिसत होते. अशा अनेक अनुभवी आख्यायिका आहेत. अगदी अलीकडे अमरावती आश्रमात आश्रितांनी तीनशे जणांचा पुरणपोळीचा बेत केला. त्याचा बोलबाला होताच अनाहूत भोजनभाऊंची भाऊगर्दी झाली. भक्तगण भग्नचित्त झाले. त्यांनी आपली असहायता श्री बाबांना सांगितली. श्री बाबांनी आपले योगसामर्थ्य पणास लावले. त्यांनी त्या स्वयंपाकास आपल्या सिद्धहस्ताचा स्पर्श केला. पुरणपोळ्याच्या पत्रावळीवर पंगती बसल्या. अन्नपूर्णा मायेने सत्व राखले. सायंकाळी आकाश ढगाळून कडाडले. श्री

बाबांनी पूर्व सूचना देताच सारे पळाले. पाणी पडण्यापूर्वीच पंगती पांगल्या. पूर्णब्रह्म अन्न पुरुन उरले. नदीनाले एक झाले. 'जगात पिशाच्च अंतरी शहाणा' असा बाबांचा बाणा. प्रसंगीच ते प्रगट होत.

असे होते सर्वांचे आवडते जयराम बाबा. जयरामाना आराम माहीत नव्हता. ते जयवंत झाले, यशवंत झाले. अगदी अखेरच्या क्षणापर्यंत त्यांनी देवीच्या देवळात वर्षानुवर्षे ज्ञानेश्वरी प्रवचनाचा परिपाठ ठेवला. तेथे बाराहि महिने दर एकादशीला ते वारकरी टाळ मृदंगाच्या साथीत कीर्तने करीत. श्री बाबांच्या कीर्तन प्रवचनांची किरणे पूर्वीच प्रकाशित झाली आहेत. महाराजांच्या एका प्रवचनाचा ध्वनिमुद्रित आवाजहि आज उपलब्ध आहे. १९६५ च्या २२ जुलैला त्यांचे अखेरचे प्रवचन एकवीरेपुढे झाले. उदईक आम्ही आपल्या गावी जाणार असे जाहीर करून त्यांनी आषाढ वद्य नवमीला शुक्रवारी पंचपंच उषःकाली परलोकी प्रयाण केले. कर्तृत्व जाहले सफल. जीवीतहि झाले सफल. 'शतायुर्वै पुरुषः' 'जीवेत शरदःशतम' हे श्रुतिवचन त्यांनी सार्थ केले. विवऱ्याला त्यांचे दोन वारकरी पुत्र असून एक त्यात एम्. बी. बी. एस. डॉक्टर आहे.

★

## श्री. रमणिकभाई सरैया यांचे देहावसान

आमचे स्नेही आणि 'राष्ट्रवाणी' या श्रीसाईसेवा प्रचारार्थ गुजरातीतून प्रकाशित होणाऱ्या धार्मिक पाक्षिकाचे संपादक, मालक, प्रकाशक श्री. रमणिक भाई नाथालाल सरैय्या यांचे बोरीवली येथे काही महिन्यापूर्वी कर्क रोगाच्या विकाराने दुःखद निधन झाले. ते साईबाबांचे परमभक्त होते. केवळ भक्तीभावनेने त्यांनी श्रीबाबांच्यावर गेली ३१ वर्षे नियमितपणे राष्ट्रवाणीचे प्रकाशन केले. त्यांच्या निधनाने भारतातून केवळ साईबाबांवरच प्रकाशित होणाऱ्या एका गुजराथी पाक्षिकाचा आता अंत झाला आहे. ते आता कायमचेच बंद झाले आहे. श्री. सरैय्या यांचे मागे त्यांच्या पत्नी, तीन पुत्र व दोन विवाहित कन्यका आहेत. मृत्युसमयी श्री. रमणिक भाई यांचे वय ६५ वर्षांचे होते.

श्रीसाई मृतात्म्यास चिरसद्गती देवो.

# मुखपृष्ठावरील चित्राची रंजक जन्मकथा

श्रीसाईलीलेच्या या खास गुरुपौर्णिमा अंकाच्या मुखपृष्ठावर श्रीसाई-बाबांचे सुंदर चित्र छापलेले आहे. हे चित्र शिरडीतील द्वारकामाईत धुनीसमोर एका उच्चासनावर छानदार, पॉलिश केलेल्या मखरात ठेवण्यात आलेल्या बाबांच्या तसबिरीचे आहे. हे चित्र चांदीच्या चौकटीत व्यवस्थितपणे मढविण्यात आलेले आहे.

१९१६ सालच्या आश्विन महिन्यातील गोष्ट. साईभक्त रावबहादूर मोरेश्वर विश्वनाथ प्रधान यांनी मुंबईत विलेपारले येथे रहाणारे तत्कालीन सुप्रसिद्ध चित्रकार श्री. शामराव रामचंद्र जयकर यांना शिरडीस जाऊन बाबांचे तैलचित्र काढण्याची विनंती केली. त्यांच्या विनंतीला मान देऊन जयकर बाबांचे चित्र काढण्यासाठी शिरडीला मुद्दाम आले. एका साध्या सुध्या सौंदर्य विहीन फकीराचे चित्र ते काय काढावयाचे नि काय रंगवायचे ही शंका त्यांच्या मनात डोकावत होती. परंतु प्रत्यक्षात प्रकार निराळाच घडला. द्वारकामाईत पाऊल त्यांनी टाकले मात्र. बाबांची तेजःपुंज मुद्रा, त्यांचे ते अंतःकरणाचा वेध घेणारे पाणीदार, तेजस्वी डोळे, गुलाबी अंगकांती हा सर्व थाट बघून जयकर अक्षरशः स्तिमित झाले अन् बाबांच्याकडे बघतच राहिले! जयकरांची मनोवृत्ती अंतर्ज्ञानी बाबांनी ओळखून ते मिस्किलपणे त्यांना म्हणाले, 'माझ्या सारख्या गरीब फकीराचे चित्र ते काय काढायचे!" पण जयकरांनी स्वतः विनंती करून व माधवराव देशपांडे उर्फ शामा यांच्या मध्यस्तीने चित्र काढण्याची परवानगी मिळवलीच.

श्रीबाबांना पुढ्यात बसवून बघता बघता जयकरांनी एका ऐवजी चार तैलचित्रे काढली ती अगदी हुबेहूब व एकसारखी होती. पैकी दोन प्रधानांनी लगलीच विकत घेतली. एक बाबांनी स्वतः काकासाहेब दीक्षितांना दिले आणि सर्वात मोठे हे चित्र कुठे ठेऊ म्हणून भक्ताने विचारले. तेव्हा "ठेव इथं ते द्वारकामाईत." म्हणून बाबांनी सांगितल्यावर तेव्हापासून आजतागायत व पुढेही हे तैलचित्र द्वारकामाईत बाबांच्या बैठकीवर हे असे विराजमान झालेले आहे. बाबा कसे दिसत होते याचा उत्कृष्ट नमुना म्हणून हेच चित्र दाखविता येईल.

साईभक्तांच्या गाठीभेटी......५१

# दिल्लीचे परमसाईभक्त श्री. आर. एस. चिटणीस

● साईनंद



● दिल्लीमध्ये लोदी रोडवर भगवान श्री साईबाबांचे एक भव्य मंदिर आहे. दिल्ली आणि दिल्लीच्या परिसरातील सर्वात मोठे व बाबांची प्रेक्षणीय मूर्ती असलेले हेच काय ते एकमेव मंदिर होय. या मंदिरातील साई-नाथांची मूर्ती शिरडी समाधी मंदिरातील बाबांच्या मूर्तीपेक्षाही किंचित् मोठी असून ती जयपूरी संगमरवराची आहे. दिल्लीतील साईभक्त मंडळी दिवस भरात या मंदिरात जातात आणि आपल्या लाडक्या बाबांचे दर्शन घेऊन कृतकृत्य होतात. या मंदिराचे चालक-मालक-संचालक आहेत दिल्लीतील एक लक्ष्मीपुत्र सुप्रसिद्ध उद्योगपती श्री. राम-मोहन शांताराम चिटणीस. कोकणातील दापोली येथल्या या चिटणीस घराण्याने दिल्ली सारख्या भारताच्या केंद्रस्थानी जाऊन आज चित्रपट क्षेत्रात चांगलीच क्रांती केली आहे इतकेच नव्हे तर श्रीसाईबाबांचे भव्य मदिर बांधून, आणि श्रीसाईभक्त समाज या मंडळाची स्थापना करून अध्यात्मिक क्षेत्रातही भरीव कामगिरी केली आहे याबद्दल खरोखरच त्यांचा गौरव करावासा वाटतो; आणि आता अगदी नजिकच्या काळात तर साईबाबांविषयीचे मराठी हिंदी इंग्रजी तून लेख असलेले एक मासिकही ते सुरू करून संत साहित्य सेवा पण करणार आहेत. श्रीसाईसच्चरित्रकार श्री. दाभोळकर उर्फ हेमाडपंत हे पण चिटणीसांच्या या दापोलीचेच.

विविध उद्योगी श्री. चिटणीस यांचा जन्म दापोली येथे ता. ६ एप्रिल १९२१ रोजी झाला. रामनवमीच्या दिवशी ते जन्मले म्हणून त्यांचे नाव राममोहन असे ठेवण्यात आले. छोट्या राममोहनचे काही शिक्षण दापोली येथे झाले. तिथल्या आॅलफ्रेड गॅडनी हायस्कूल मधून ते मॅट्रीक उत्तीर्ण झाले. वयाच्या २२ व्या वर्षी ते दापोलीहून दिल्लीला गेले. पुढील विद्यार्जनासाठी त्यांनी तेथल्या हिंदु कॉलेज

नाव दाखल केले, व १९४४ साली ते बी. ए. पदवीधर झाले. इतर शहरे किंवा ठिकाणे सोडून ते सरळ दिल्लीलाच का गेले. आहे माहित! त्याचे असे झाले राममोहनांचे सख्खेमामा पुरुषोत्तम राजाराम टिपणीस हे चित्रपट उद्योगानिमित्य दिल्लीलाच स्थायिक झाले होते. त्यावेळी भारताची राजधानी दिल्ली नव्हती तर कलकत्ता होती. दिल्लीतील खैबर पास जवळचे रिंक हे जुने पहिले थिएटर हे याच टिपणीसांचे. पुढे त्यांनी मॅजेस्टिक, ज्युबिली, निशात, न्यू रॉयल, सेंट्रल अशी थिएटरे पण खरेदी केली व याच उद्योग व्यवसायात ते रमलेले असत. १९३५ साली त्यांनी दिल्ली सदर बाजारात वेस्ट एण्ड, व १९३८ साली हौज काझी या विभागात 'एक्सलसियर' ही दोन नवीन थिएटरे खरेदी केली. आपल्या वाढलेल्या व्यापाची देखभाल करण्यासाठी त्यांनी तरुण राममोहनना दिल्लीला बोलावले. दिल्लीला ते बी. ए. झाले, व इनशुरंस कंपनीत दोन-तीन वर्षे नोकरी पण केली; व थिएटरांची पण देखभाल ते करू लागले.

श्री. आर. एस. चिटणीस यांचा विवाह १९५० साली झाला. त्यांच्या पत्नी सौ. पद्मजा या पूर्वाश्रमीच्या देवास ( थोरली पाती ) च्या फडणीस घराण्यातल्या.

श्री. चिटणीस यांचा व श्रीसाईबाबांचा परिचय झाला तो विवाहानंतर १९५० साली. एके दिवशी त्यांच्या सासऱ्यांनी त्यांना एका संत पुरुषाचे रंगीत चित्र दाखविले व हे कोण? यांचे नाव काय? असे विचारले. त्यांनी ते चित्र न्याहाळून, निरखून बघितले आणि ओळखता येत नाही म्हणून मान हालविली. हे शिरडीच्या श्रीसाईबाबांचे चित्र आहे असे सासऱ्यांनी सांगताच का कुणास ठाऊक त्यांना अत्यानंद झाला. ते चित्र पहाताच एका गूढ, अदृश्य शक्तीने जणू काय आपणास भारावूनच टाकले आहे असे त्यांना क्षणभर वाटले. आपल्या एका परिचित मित्राने आपणास हे चित्र दिले असून महाराष्ट्र, गुजराथ, द. भारत येथली भाविक जनता या श्रेष्ठ संताची अनन्यभावे पूजा करते एवढेच काय ते त्यांना म्हणाले आणि आणखीन काही माहिती मात्र ते त्यांना सांगूच शकले नाहीत म्हणून आर. एस. अगदी नाराज झाले. पण काय असेल ते असो त्या दिवसापासून त्यांनी साईबाबांविषयी जास्तीत जास्त माहिती मिळविण्याचा दिल्लीस अगदी कसोशीने यत्न केला पण त्यांना फारशी काही माहिती मिळेचना. पुढे काही महिन्यानंतर ते आपल्या आप्तनातलगांच्या बोलावण्यावरून मुंबईला आले; पण त्यांच्याकडूनही फारशी काही त्यांना बाबांची माहिती मिळेचना. फक्त हे महाराष्ट्रातले एक थोर संत, सतपुरुष होऊन गेले, त्यांची समाधी शिरडीला आहे या पलिकडे कुणी त्यांना काहीच सांगेना. साईबाबांचा तो तेजस्वी प्रसन्न चेहरा,

ते लुकलुकणारे तेजस्वी डोळे, तो समाधानाने आशिर्वाद देणारा हात याने तर तरुण चिटणीस अक्षरशः भारावून गेले आणि दिवसेंदिवस त्यांची बाबांच्याबद्दलची उत्कंठा, उत्सुकता, चौकसपणा वाढूच लागला.

१९५१ साली श्री. चिटणीसांनी पुन्हा मुंबईला घावती भेट दिली. एकदा मुक्कामात त्यांची गाडी भरगर्दीच्या रस्त्यावरून जात असताना एका दुकानात त्यांना बाबांचा फोटो दिसला. झटकन् त्यांनी आपली गाडी थांबवली आणि धावतच ते दुकानाकडे जाऊन दुकानदाराला बाबांच्या फोटोकडे बोट दाखवित म्हणाले, अहो, मला या साईबाबांच्याविषयी माहिती काही सांगू शकाल काय ? तो दुकानदार खरोखरीच साईभक्त होता. त्याने अदबीने चिटणीसांचे स्वागत करून त्यांना बाबांविषयी भरपूर माहिती देऊन श्रीसाईबाबा संस्थान शिरडीच्या मुंबई कार्यालयाचा पण पत्ता दिला. त्यावेळी मुंबईतील कार्यालय कोटात इस्ट ॲण्ड वेस्ट बिल्डिंगमध्ये होते. वेळ न दवडता चिटणीस त्या कचेरीत गेले आणि त्यांनी श्रीसाईबाबांविषयीची माहितीची अशी भरपूर पुस्तके खरेदी केली आणि त्याशिवाय श्रीसाई सच्चरिताची १९५१ सालची आवृत्ती पण विकत घेतली. तेव्हा पासून आजतागायत ही पोथी त्यांचेकडे अगदी सुव्यवस्थित असून तिचे अनेकदा विधीपूर्वक वाचन त्यांनी केलेले आहे. ही पोथी म्हणजे आपल्या जवळील, एक सोबत, बहुमोल ठेवा आहे असे ते समजतात. जगातील सारी संपत्ती जरी आपल्या पुढे ओतली तरी ती पोथीप्रत आपण कुण कुणाला म्हणून देणार नाही असे ते अभिमानपूर्वक सांगतात.

गेली ३१ वर्षे श्री. राममोहन चिटणीस बाबांची भक्ती भावाने पूजा, अर्चा, सेवा, प्रार्थना करीत आहेत. बाबांची तत्वप्रणाली विचार सरणी नीतीमूल्ये आचरणात आणण्याच्या शुद्ध व पवित्र भावनेने १९६६ साली विजयादशमीस दिल्लीतील सदर बाजार येथे त्यांनी श्रीसाई भक्त समाज या संस्थेची स्थापना केली. ही संस्था रजिस्टर करण्यात आली असून श्री. चिटणीस हे त्या संस्थेचे अध्यक्ष आहेत. या संस्थेतील भक्तांच्या सहकार्याने व बाबांच्या कृपाशिर्वादामुळे त्यांनी १९७२ साली नव्या दिल्लीतील लोदी रोडवर जागा खरेदी करून तिथे बाबांचे एक भव्य मंदिर १९७५ साली बांधून पूर्ण केले व त्यामध्ये बाबांच्या मूर्तीची पण प्रतिष्ठापना केली. या मंदिराचे नाव आहे श्रीसाईबाबा मेमोरीयल. साडे आठ लाख रुपये या मंदिराला खर्च आला. आज चिटणीस साहेब संपूर्ण दिवसभर आपल्या चित्रपटांच्या उद्योग व्यवसायात आणि बाबा भक्तांच्या नि बाबांच्या सेवेत मग्न असतात. देवदत्त व गुरुदत्त असे दोन सोन्यासारखे पुत्र त्यांना आहेत. देवदत्त बी. ए. तर गुरुदत्त बी. एस्. सी. असून आपल्या वडीलांप्रमाणेच ते दोघेही साईबाबांचे भक्त आहेत.

१९५२ सालापासून श्री. चिटणीस शिरडीला जात आले आहेत. त्यावेळी शिरडीला एक प्रकारची अवकळा आलेली होती. जिथे तिथे घाणीचे उकीरडे, भिकारी माशा, डास यांचा भयंकर त्रास होता. आज मात्र ही परिस्थिती संपूर्णपणे पालटली आहे असे ते सांगतात. दररोज बाबांचे पूजन अर्चन, स्मरण, प्रार्थना वंदन याशिवाय यांचा एकही दिवस जात नाही. आजही श्री. चिटणीस शिरडीला श्रीबाबांच्या समाधीमंदिराला भेट देतात. बाबांच्या मनोहर पुतळ्याचे डोळे भरून दर्शन घेतात आणि समाधीस्थानाचे साश्रुनयनांनी दर्शन घेऊन दिल्लीला परततात. दिल्लीच्य त्यांच्या साईमंदिरात बाबांचे सर्व उत्सव होतात व दररोज चारदा विधियुक्त आरती होते. आपल्या जीवनात श्रीसाईबाबांनी अपरिमित क्रांती केली आहे. आपल्या संपूर्ण जीवनाचे सारसर्वस्व बाबाच होत असे श्री. चिटणीस सांगतात.

श्री. चिटणीस यांच्या मातोश्री कमळाबाई या पण देव मानणाऱ्यांपैकी होत्या. वडीलांना तर संत संग सहवास आवडायचाच. पण त्यांच्या मातोश्री १९६८ साली व वडील १९७७ साली साईचरणी विलीन झाले. स्वतः चिटणीससाहेब आणि त्यांची भावी पिढी ही मात्र निश्चित साईप्रेमी, साईवेडी आहे. श्री. चिटणीसांना ऐतिहासिक आणि अध्यात्मिक पुस्तके गोळा करणे व त्यांचे वाचन करणे हा जणू काय त्यांना एक छंदच लागला आहे. ☆



# "A MISSION DIVINE!"

## "मशिदीत प्रगटला परमेश्वर!"

A novel in English and Marathi on the great Saint of Shirdi which takes you into the past and gives you a glimpse of the most thrilling, divine and mysterious life of Sai Baba, compelling you to finish it in one reading-and restart for another.

Price Rs. 45/-for English: for Marathi Rs. 36/- postage Rs. 4·50 each : A proud possesion for GURU POORNIMA DAY–17 th July, 1981.

**PRASHANTI PRAKASHAN, 5 Vasant Apartments, 47 Kastur Park, Shimpoli Road, Borivali (W), Bombay 400 092.**


स्थान
पावित्र्य व
आपले
कर्तव्य आहे.

# * श्रीसाईबाबांचे गुरुस्थान *

—सदानंद चेंदवणकर
कार्यकारी संपादक श्रीसाईलीला
श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

* श्रीक्षेत्र शिरडीमध्ये येणाऱ्या प्रत्येक भक्ताला पहिल्या प्रथम ज्या वास्तूचे दर्शन घडते ती वास्तू म्हणजे गुरुस्थान होय. ही वास्तू छोटीशी जरी असली तरी ती अतिशय महत्वाची आणि मोठी रम्य अशी आहे. या वास्तूच्या परिसरात नुसते बसून जरी राहिले तरी मन चांगले रमून जाते आणि किती वेळ गेला याचे भानच रहात नाही. अनेक भक्तांना याठिकाणी बसून राहून आपल्या दुःखांना विसर पडला आहे तर अनेकांना जागृती, चेतना, प्रेरणा याच ठिकाणापासून मिळालेली आहे. संत चूडामणि भगवान श्री साईबाबा याच ठिकाणी असलेल्या निंब वृक्षाखाली शिर्डीत प्रथम अवतीर्ण झाले त्यावेळी त्यांचे वय अवघे सोळा वर्षांचे होते. येथे असलेला निंबवृक्ष श्रीसाई समाधीमंदिराच्या अगदी पाठीमागेच आहे. शिरडीतील नाना चोपदाराच्या आईने प्रथम बाबांना या निंबवृक्षाखाली बसलेले प्रथम पाहिले. त्यावेळी त्यांचा पोषाख पायघोळ कफनी एवढाच होता.

नाना चोपदाराच्या आईने जेव्हा शिर्डी गावात या तरुण सतेज फकीराबद्दल सांगितले तेव्हा गावकरी या छोट्या बाबांच्या हालचाली पहात असत. पण हे बाबा कुणाशी कधी बोलले नाहीत की चालले नाहीत. तेथल्या गावकऱ्यांच्या अस्तित्वाची त्यांना दाद फिर्यादच नव्हती. गावकऱ्यांनी त्यांचा एकंदर पेहराव बघितला आणि तर्क केला की ते एखादे मुसलमान फकीर असावेत. सबंध दिवसभर हा फकीर त्या निंबाच्या झाडाखाली बसलेला दिसायचा. इतकेच नव्हे तर रात्रीच्या वेळी त्या झाडाच्या बाजुने कुणी आले गेले तरी त्याला हा फकीर त्याच जागेवर बसलेला आढळून यायचा. त्याने कधी कुणाजवळ भाकरीची भीक मागितली नाही की पेलाभर पाण्याचीसुद्धा मागणी केली नाही तो आपली निंबतरुतळीची जागा सोडत नाही तेव्हा हा कुणी तरी अवलिया असावा अशी गावकऱ्यांची खात्री झाली. गावकऱ्यांनी या फकिराला बोलते करण्याचे उपाय केले पण तो जेव्हा काहीच सांगेना तेव्हा गावातल्या खंडोबाच्या देवळात कौल लावण्यात आला आणि त्याने सांगितले हा फकीर जिथे बसतो तिथे दोन पुरुष खोल खणून पहा म्हणजे या फकीराचा पत्ता लागेल.

हे फकीर ज्या निंबवृक्षाखाली अहोरात्र बसत असत त्यांच्या शेजारीच कै. रावबहादूर हरी विनायक साठे डेप्युटी कलेक्टर अहमदनगर यांचा वाडा त्यावेळी होता. तो चोहोबाजूनी माती व विटा यानी बांधलेला होता. त्याला पूर्व व पश्चिम बाजूस दिंडी दरवाजे होते. या निंबवृक्षाच्या शेजारी वाड्यातील पुढील दरवाजा नजवळ जिन्याखाली एका कमानीत गावकऱ्यांनी खणून पाहिले तो काय! आतमध्ये एक मोठाच चमत्कार दिसला. तिथे १०×१० फूटाची एक खोली त्यांना दिसली. खोलीत पाट व बाजूला पेटत्या समया आणि पाटावर व्याघ्रमुखी कातडे व जपमाळ दिसली.

आश्चर्य चकित झालेल्या गावकऱ्यांनी या फकीराकडे म्हणजेच तरुण बाबांकडे नम्रतेने पाहिले व याचा उलगडा करण्याची त्यांना विनंती केली. तेव्हा ते म्हणाले, "ही माझ्या सद्‌गुरुरायाची जागा आहे." आणि हे सिद्ध करण्याकरिता आपला उजवा हात निंबवृक्षाच्या पुर्वाभिमुख असणाऱ्या खांदीवर ठेऊन बाबा म्हणाले," हे सत्य आहे. आजपासून या झाडाच्या बाजूचा कडवटपणा निघून जाईल आणि जो कुणी गुरुवारी व शुक्रवारी याठिकाणी सारवून ऊद जाळील त्याचे कल्याण होईल" नंतर कमानीजवळची खणलेली जागा गावकऱ्यांनी कायमची बंद केली. बाबांच्या निर्वाणा नंतर तत्काली स्थापन झालेल्या संस्थान कमेटीने त्या जागी एक लहानसे मंदिर बांधले. हेच मंदिर आज गुरुस्थान म्हणून ओळखले जाते.

श्रीसाईबाबांचे गुरु म्हणजे गोपाळराव केशवराज बाबासाहेब महाराज हे होत. त्यांनीच अल्पवयात बाबांना सर्व प्रकारच्या योगविद्या शिकवून त्यांच्या मनःपटलावर उत्कृष्ट संस्कार केले. आपल्या या गुरुचा उल्लेख ते व्यंकुजीशहा उर्फ 'व्यंकुसा' असे करीत असत. श्रीसाईनाथांच्या या गुरुच्या संबंधाने लेख याच अंकात अन्यत्र दिलेला आहे.

श्री गुरुस्थान मंदिर श्रीबाबांच्या समाधी मंदिराच्या अगदी पाठीमागे असून ते जमिनीपासून एक फूट उंचीच्या चौरस अशा ओट्यावर उभारलेले आहे. या ओट्याला एकच टप्प्याची पायरी आहे. हे मंदिर पश्चिमाभिमुख असून या मंदिराचा संपूर्ण परिसर लादीने आच्छादलेला आहे व तो हरहमेशा झाडून लोटून स्वच्छ ठेवला जातो. मंदिराच्या तीन भागाच्या भिंती निम्म्याहून थोड्या किंचित् वर व्यवस्थित बांधलेल्या असून उरलेल्या भागावर लोखंडी पट्ट्यांनी जाळी बसविलेली आहे. मंदिराच्या मध्यभागी लाकडी दरवाजा असून त्या दरवाजाच्या काही भागावरही जाळी बसविलेली आहे. दरवाजाबाहेर एक पितळी घंटी टांगलेली आहे. या मंदिराचा जीर्णोद्धार आश्विन शुद्ध १० शके १८६३ म्हणजे ३०–९–१९४१ मध्ये केला गेला व त्यानंतर सध्याचे मंदिर हे अलीकडच्या काळात बांधण्यात आले आहे.

या छोटेस्वामी गुरुस्थान मंदिरात एक लहानसे देऊळ आहे व त्या देवळावर साजेसाच एक कळसही आहे. या देवळात एका उच्चासनावर श्रीबाबांची भव्य तसबीर ठेवण्यात आली असून त्या तसबीरीला चांदीची फ्रेम मुंबाईचे श्रीचंदुभाई शहा (पटेल) या भक्ताने करून दिली आहे. या तसबिरी पुढेच शिवपिंडी असून त्या पिंडीची शाळूंका उत्तरेकडे तोंड करून ठेवण्यात आली आहे. ही शंकराची पिंडी श्रीबाबांनी स्वहस्ते स्थापन केलेली आहे हे विशेष होय. या पिंडीच्या जवळच एक स्फटिकाचा नंदी आहे. या छोटेखामी मंदिराच्या बाहेरच्या अंगास त्यातच बाबांचा एक संगमरवरी पॉप्युलर पोजचा छोटेखानी पुतळा आहे. तो मुंबईचे एक साईभक्त श्री. यशवंतराय दवे यांनी १९७४ साली तिथे वेदमंत्रांच्या सोपस्कारासह प्रतिष्ठापित केला. त्यावेळी या मूर्तीच्या वजनाइतका तांदूळाचा भात प्रसाद रूपाने भक्तांना वाटण्यात आला होता. मंदिरात एक लोखंडी तिजोरी पण असून तिच्यात भक्त पैसे टाकतात. छोटेखामी मंदिराच्या उजव्या बाजूला निंबवृक्षाचा घसघशीत बुंधा आहे. या गुरुस्थान मंदिराच्या छपरातून वरच्या दिशेने हा वृक्ष वरती फोफावला असून त्याच्या फांद्याना उपफांद्या फुटलेल्या असून हिरवीगार पाने आहेत. एरवी कडू-निंबाची पाने कडवट लागतात पण ही पाने दाताखाली चावली तर ती गोडूस लागतात ही सारी साईबाबांची किमया आहे अशी समस्त साईभक्तांची श्रद्धा आहे. या निंब वृक्षाखाली बाबांच्या पादुका आहेत असे म्हणतात. या वृक्षाच्या बुंधा असलेल्या मंदिराच्या कोपऱ्यात एका काचेच्या कपाटात दोन पितळी समया तेवत असतात.

या निंबवृक्षाच्या पुढेच एका चौकोनी संगमरवरी तीन फुटी चबुतऱ्यावर कमल दल वेष्टित पादुका स्थानापन्न करण्यात आलेल्या आहेत. या चौकोनी चबुतऱ्याच्या दर्शनी भागावर पुढील श्लोक कोरलेला आहे. तो असा—

॥ श्रीसद्गुरु साईबाबा ॥
सदा निंबवृक्षस्य मूलाधिवासात् ।
सुधास्त्राविणं तिक्तमप्यप्रियं तम् ॥
तरूं कल्पवृक्षाधिकं साधयंतम् ।
नमामीश्वरं सद्गुरूं साइनाथम् ॥ १ ॥
अनेक जन्मार्जित पापसंक्षयो ।
भवेद्भवत्पाद सरोजदर्शनात् ॥
क्षमस्व सर्वान परोध पुंजकान्प्रसीद ।
साईश गुरो दयानिधे ॥ २ ॥
= शके १८३४ श्रावण शुद्ध १५ =

हा श्लोक संत श्री उपासनी महाराजांनी करून दिलेला आहे.

शिरडीतील निंबवृक्षाखाली स्थापन करण्यात आलेल्या या पादुकांची कथा मोठी रंजक आहे—

इ. स. १९१२ सालची गोष्ट श्रीबाबांच्या दर्शनास त्यावेळी मुंबापुरीचे एक प्रसिद्ध डॉक्टर रामराव कोठारे आले होते. त्यांच्याबरोबर त्यांचे कंपाऊंडर गोविंद कमलाकर दीक्षित, मित्र भाई कृष्णाजी अलिबागकर ही मंडळी पण आली होती. एके दिवशी गप्पा मारता मारता शिरडीतील प्रसिद्ध खानावळवाले व साईभक्त सगुण मेरू नाईक, कंपाऊंडर दीक्षित व भाई अलीबागकर या मंडळींचा असा विचार ठरला की साठे यांच्या वाड्यात निंबवृक्षाखाली जिथे बाबा हमेशा बसत असत त्याठिकाणी काही खूण असावी व त्या खूणेसाठी म्हणून भाई अलीबागकर याने लागलीच बाबांच्या साध्या दगडी पण ओबड धोबड अशा पादुका तयार पण करून आणल्या त्या बघून कंपाऊंडर दीक्षित म्हणाले, आमच्या डॉक्टर साहेबांना हे जर कळले असते तर त्यांनी या पादुकांपेक्षा कितीतरी उत्तम पादुका तयार करून पाठविल्या असत्या. झाले! डॉ. रामराव कोठारे यांना चांगल्या पादुका तयार करून आणा म्हणून कळविण्यात आले. काही दिवसातच डॉ. कोठारे संगमरवरी पादुकांचा एक नकाशा तयार करून तो घेऊन ते शिरडीस आले. ते थेट उपासनी महाराजांकडे, श्री खंडोबाच्या देवळात गेले. त्यांनी तो नकाशा त्यांना दाखवला त्यावर श्री उपासनी महाराज त्यांना म्हणाले "तुम्ही जे हे सारे करता आहात ते सर्वठीक आहे. परंतु नुसत्या पादुका तयार न करता मी सांगतो त्याप्रमाणे त्यावर कमळे, बेलपत्री, शंख, चक्र, गदा, पद्म वगैरे आकृत्या काढून चारी बाजूंनी त्यास संगमरवरी दगडाचे पाट लावा. पादुकांची बैठक नेहमी उच्चासनावर असावी, नुसत्या जमिनीवरती नसावी व त्या पाटाच्या पुढच्या भागावर निंबवृक्षाची महती व श्रीबाबांचे योगेश्वर दर्शन गीर्वाण भाषेत श्लोकात लिहावे.'

भक्त डॉ. रामराव कोठारे यांनी उपासनी बाबांची ही गोष्ट मान्य केली व त्याप्रमाणे पादुका मुंबईस तयार करून घेऊन त्या कपांऊडर दीक्षित बरोबर शिर्डीस पाठवून दिल्या. कंपाऊंडरने त्या पहिल्या प्रथम खंडोबाच्या मंदिरात आणल्या. तिथे त्या दोन दिवस राहिल्या. त्यांची स्थापना निंबवृक्षाखाली केव्हा करावी याबद्दल कंपाऊंडरने बाबांच्याकडे अनुज्ञा मागितली. त्यावर 'श्रावण शुद्ध पौर्णिमेच्या दिवशी म्हणजे नारळी पौर्णिमेच्या दिवशी त्या पादुका निंबवृक्षाखाली स्थापन करा' असे स्वतः श्रीसाईबाबा म्हणाले, त्याप्रमाणे त्या दिवशी कंपाऊंडर दीक्षित यांनी त्या पादुका सकाळी ११ वाजता मस्तकावर घेऊन श्रीखंडोबाच्या मंदिरापासून द्वारकामाईपर्यंत त्यांची मोठी मिरवणूक वाजत गाजत काढली. द्वारकामाईत बाबांच्या चरणांवर

त्या आणून ठेवल्या. श्रीसाईनाथांनी त्या पादुकांना हस्त स्पर्श केला व 'हे सच्चिदानंद परमेश्वराचे पाय आहेत. त्यांना बाज्यात निंबवृक्षाखाली स्थान द्या' असा आदेश दिला. त्यानुसार त्या पादुका लगेच त्याच दिवशी या गुरुस्थानी स्थापन करण्यात आल्या आहेत.

या पादुका बसविताना मुंबईतील एक पारशी भक्त पास्ताशेट यांनी बाबांना देण्यासाठी म्हणून २५ रु. ची मनीऑर्डर भाईंच्या नावावर केली. ती भाईंना या पादुका बसविण्याच्या आदल्या दिवशी मिळाली. भाईंनी ती लगेच बाबांना दिली. उद्या आपल्याला ती खर्चास होईल असे सांगून ती रक्कम बाबांनी भाईजवळ परत दिली. वास्तविक पास्ताशेटजी व डॉ. कोठारे यांचा अर्था अर्थी काही एक संबंध नाही. डॉक्टर कोठारे यांनी पादुका पाठविल्या खऱ्या पण त्या स्थापन करण्यासाठी येणाऱ्या खर्चासाठी काहीएक पाठविले नव्हते.

निंबतरु तळी या पादुका स्थापत करण्याच्या परम पवित्र प्रसंगी कै. श्री उपासनी महाराज, कै. बापूसाहेब जोग कै. बाळासाहेब माटे, मामलेदार, कै. दादा केळकर इ. प्रतिष्ठीत मंडळी हजर होती. या सोहळयानिमित्य भोजन व इतर खर्च एकूण शंभर रु. त्यावेळी आला. पैकी बाबांनी २५ रु. दिले व ७५ रु. भाई कृष्णाजी, वासुदेव आप्पाजी व कंपाऊंडर दीक्षित या मंडळींनी दिले. या पादुकांची पुजा–अर्चा स्वतः श्री. दीक्षित १९१२ ते १९१७ पर्यंत पाचवर्षे करीत होते. वेळप्रसंगी ते माधुकरी मागून आणून आपला उदरनिर्वाह करीत असत.

या पादुकांच्या स्थापनेच्या निमित्याने प्रसंगात उल्लेखिलेले डॉ. रामराव कोठारे यांचे परमस्नेही श्री. भाई कृष्णाजी अलिबागकर हे श्रीसमर्थ अक्कलकोट स्वामींचे भक्त. बाबांच्या पादुका निंबवृक्षाखाली स्थापन करण्याच्या प्रसंगी ते अक्कलकोटला जाण्यासाठी तिथे आले होते. बाबांचे दर्शन घेऊन मग पुढे अक्कलकोटला जाऊ असा त्यांचा विचार होता. त्याप्रमाणे त्यांनी बाबांचे दर्शन घेतले व आता मी अक्कलकोटास जातो असे ते बाबांना म्हणाले, 'त्यावर बाबा म्हणाले,' अरे अक्कलकोटास काय आहे ! तिथे कशाला जातोस तेथलाच मी येथे आहे हे ऐकताच भाई अक्कलकोटास गेले नाहीत.

या निंबवृक्षाखाली जिथे बाबा बसत असत त्या बाजूच्या फांदीची पाने किंचित गोड वाटतात असे भक्तांचे म्हणणे आहे. पण या कडूनिंबाची पाने तोडण्याची परवानगी मात्र नाही. झाडावरच तशी पाटी लावण्यात आली आहे.

पादुका व निंबवृक्ष यांच्या सभोवती मंदिराच्या बाहेरून प्रदक्षिणा घालता येते. मंदिरात बारा ज्योतिर्लिंगाच्या तसबिरी चारी बाजूंना लावण्यात आलेल्या आहेत. मंदिरासमोरच्या फरसबंद अंगणात मंदिराच्या दरवाजासमोरच उंचावर एक धूपपात्र ठेवण्यात आले असून तिथे पेटते लाकूड हमेशा असते तिथे भक्त मंडळी येता-जाता धूप घालत असतात. प्रत्येक गुरुवारी शुक्रवारी येथे जो उद जाळील त्याचे कल्याण होईल असे बाबा नेहमी सांगत म्हणून धूप जाळणाऱ्यांसाठी ही सोय अशी करून ठेवण्यात आली आहे, व तशा अर्थाची एक पाटी पण तिथे लावलेली आहे. फरसबंद अंगणात सिमेंट-कॉंक्रीटची ४-५ बाके ठेवण्यात आली असून भक्तमंडळी तिथे बसण्यात आनंद मानतात. येथे रात्रीही चांगलाच चकचकाट असतो.

या गुरुस्थानाकडे येण्यासाठी उत्तरेस व दक्षिणेस दरवाजे आहेत. दक्षिण दरवाजालगतच एक छोटेखानी बाग आहे. ती स्वतः बाबांनी केलेली होती. तिथे स्वतः लावलेल्या फुलझाडांना ते खांद्यावरून घागरी वाहून आणून पाणी घालीत असत त्या जागेची आठवण म्हणूनच की काय सध्या पण तिथे बाग आहे व त्या बागेसभोवती लोखंडी कठड्याचे कुंपण घालण्यात आलेले आहे. बागेत विविध फुलांची रोपटी आहेत. श्रीगुरुस्थान मंदिराच्या मागील असलेल्या लांबलचक चार खोल्या असलेल्या चाळीसारख्या वाड्यास साठे वाडा असे म्हणतात, तर समोरच असलेल्या तिनमजली तळमजला धरून असलेल्या वाड्यास नवलकर वाडा असे म्हणतात. या दोन्ही वाड्यातील खोल्या भक्तांना रहाण्यासाठी दिल्या जातात.

या गुरुस्थान मंदिराची देखरेख व व्यवस्था पहाण्यासाठी अवघ्या एकाच सेवेकऱ्याची नेमणूक करण्यात आलेली आहे. या गुरुस्थानची पण संपूर्ण जबाबदारी श्री. विठ्ठलराव बागवे यांचेवरच सोपविण्यात आलेली आहे. गुरुस्थान मंदिर सकाळी ४-३०वा. उघडले जाते व रात्री ९-३० वा. बंद केले जाते.

# गुरु–महिमा

● गुरुचा महिमा वर्णन करू तितका थोडाच आहे. ज्ञानेश्वरांनी आपल्या ज्ञानेश्वरीत निवृत्तीनाथांचा भाऊ म्हणून उल्लेख केलेला नसून गुरु म्हणून उल्लेख केलेला आहे.

केवढी गुरुभक्ति ! गुरुबद्दलचा आदर, गुरुबद्दल मोठेपणा संसारी जीवनात आपणास आई, वडील, भाऊ, बहीणी त्याचप्रमाणे शाळेत, कॉलेजात शिक्षक मिळतात. परंतु ते जीवन स्थूल, मिथ्या आहे, बाह्यानुकरण आहे. त्या बाह्यानुकरण जीवनाला पारमार्थिक जीवनात तसे फारसे स्थान नाही.

अध्यात्म मार्गाकडे नेणारा, परमेश्वराकडील मोक्षाचा मार्ग दाखविणारा, अज्ञानरूपी अंधार दूर करणारा म्हणजे सर्वश्रेष्ठ गुरु होय. प्राणायाम, योगमार्ग, ध्यान, समाधि या गुरुमुळे लवकर सफल होतात. म्हणूनच गुरुला ब्रह्म म्हटले आहे.

आपले सर्वश्रेष्ठ संत तुकाराम महाराज, गाडगे महाराज, एकनाथ महाराज, ज्ञानेश्वर महाराज, रामदास स्वामी यांनी आपणास फार मोठा गुरु उपदेश, कार्य करून संसारी समाज हरीमय केला.

रत्नागिरी पावसचे स्वामी स्वरुपानंद म्हणतात—

स्वामी म्हणे झाले कृतार्थ जीवन ।
सद्‌गुरु चरण उपासिता ॥
तुकाराम महाराज मूळ अभंगात म्हणतात
मानियेला स्वप्नी गुरुचा उपदेश ।
धरिला विश्वास दृढनामी ॥
यावरिया झाली कवित्वाची स्फूर्ति ।
पाय धरिले चित्ती विठोबाचे ॥

त्याचप्रमाणे ज्ञानेश्वर महाराज सांगतात—

तैसे श्री निवृत्ती राजे । अज्ञानपण हे माझे ।
आणिले वाजे । ज्ञानाचिया । १५–२५ ओवी

एकनाथ महाराज सांगतात.

म्या गुरु केला म्या गुरु केला ।
सर्व बोध तेणे मज दिला ॥ १ ॥
घालुनिया भक्ति अंजन ।
दावियेले विठ्ठल निधान ॥ २ ॥
कान फुंकूनी निगुती ।
दिधले संताचिये हाती ॥ ३ ॥
एकाजनार्दनी गुरु बरा ।
तेणे दाविले परात्परा ॥ ४ ॥

वरील प्रमाणे माणसांनी संसार जीवनात गुरूला फार महत्व दिले पाहिजे त्यांच्याशिवाय जीवन व्यर्थ होय म्हणून गुरुची भक्ति निस्वार्थ एकाग्रचित्त, एकसंध मिळून करायला हवी. त्यामुळे मानव संसारात राहून सुखी, समाधानी होतो. त्याला कधीही काही कमी पडत नाही, व गुरुमुळे भरभराट होऊन जीवन आनंदाने फुलते, बहरते.

म्हणून आपण सर्व संसारी मानव संसार करून गुरूला भजू या त्यांच्या आशीर्वादाने जीवन हरीमय करू या, परमशांती सुख घेवू या, व गुरुपौर्णिमेला त्यांच्या चरणी नतमस्तक होऊ या.

☆

## डॉ. के. भ. गव्हाणकर स्मरणिका

मुंबापुरीतील सुप्रसिद्ध साईभक्त डॉ. के. भ. उर्फ अण्णासाहेब गव्हाणकर यांनी कुर्ला येथील आपल्या संस्थेच्या वतीने शिरडी येथे सुरू केलेल्या कोजागिरी पौर्णिमा शिरडी उत्सवाला यंदा ५१ वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्य त्यांच्या चहात्यांनी व भक्तमंडळींनी एक सुंदर स्मरणिका प्रकाशित करण्याचे योजले असून ही स्मरणिका शिर्डी येथे भक्तमंडळींच्या मेळाव्यात येत्या कोजागिरी पौर्णिमेस प्रकाशित होत आहे. तरी भक्तमंडळींनी डॉ. अण्णासाहेब यांच्या विषयीचे लेख, आठवणी आख्यायिका, चित्रे इ. मजकूर व साहित्य १५ ऑगस्ट पूर्वी पुढील पत्यावर पाठवावे—

डॉ. के. भ. गव्हाणकर, इंदिरा निवास, लालबहादूर शास्त्री मार्ग, कुर्ला, मुंबई ४०००७०

गुरुपौर्णिमा १७ जुलै ८१ पासून सर्वत्र उपलब्ध

## अकराव्या अवताराची कहाणी

सर्व धर्मीयांचे आराध्य दैवत



# संतचूडामणि
# भगवान श्रीसाईबाबा

लेखक :— सदानंद चेंदवणकर कार्यकारी संपादक श्रीसाईलीला,
श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

☆ श्रीसाईबाबांचे जन्म रहस्य ☆ बाबांचे अद्वितीय योग सामर्थ्य ☆ श्रीसाईनाथांचा परकाया प्रवेश ☆ बाबांच्या अद्भुत लीला ☆ श्रीसाई एक दत्तावतार ☆ बाबांचा अंतिम दिन ☆ श्रीसाई महिमा ☆ शिरडीत बाबांचे दर्शन कसे घ्याल ☆ श्रद्धा आणि सबुरी ☆ श्रीसाईबाबांचे गहन तत्वज्ञान ☆ बाबांच्या उत्सवांच्या रंजक जन्म कथा इ. इ. खूपखूप.

या शिवाय असंख्य साईभक्तांचे अलौकिक अनुभव व अविस्मरणीय आठवणींनी नटलेला प्रासादिक ग्रंथराज

☆ आकर्षक तिरंगी मुखपृष्ठासह ८ आर्टप्लेटस ☆

पृष्ठे सुमारे २७५ ▭ पांढराशुभ्र कागद

मूळ कि. ३० रु. / १ सप्टेंबर ८१ पर्यंत सवलतीत २२ रु.

— संपर्क —

अंजली पब्लिशिंग हाऊस

१५१२ सदाशिव, पेंडसे चाळ, पुणे ४११०३०

## गुरु पौर्णिमा अर्थात व्यासपूजेचे महत्व आणि महती स्पष्ट करणारा लेख

॥ ॐ तत् सत् ॥

# ॥ श्री सद्‌गुरवे नमः ॥

" गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरु साक्षात् परब्रह्म, तस्मै श्रीगुरवे नमः ॥"

आषाढ शुद्ध १५ शके १९०३, म्हणजे व्यास-पौर्णिमा ! व्यास गुरु पौर्णिमा हा दिवस संपूर्ण जगात फार महत्वाचा मानला जातो. विशेषतः कलाकार, गायक, परमार्थ प्रेमी व समाजातील निरनिराळया थरातील साधक सिद्ध मंडळी आजच्या या दिवसाची फार आतुरतेने वाट पहात असतात. तेव्हा अशा या दिवसाचे महत्व काय ? गुरुपौर्णिमा म्हणजे काय ? याला व्यास पूजा का म्हणतात ? तसेच या दिनास अखिल विश्वव्यापक महत्व कसे प्राप्त झाले याचा आपण थोडक्यात संक्षेपाने शोध घेऊ.

प्रथमतः 'गुरु' याचा अर्थ पाहू. गुरु = गु + रु 'गु' म्हणजे अंधःकार व 'रु' म्हणजे प्रकाश ! जो आत्मज्ञान चित्सूर्य प्रकाशाने अज्ञान-अंधःकाराचा तत्काळ नाश करतो तो गुरु व तो अज्ञानहारक, व तो केवल परब्रह्म स्वरूप एकच असा आहे. म्हणजे प्रत्यक्ष ब्रह्मच, परमेश्वर व ब्रह्मा, विष्णू, महेश हे त्याचेच रूप ! अशा या गुरुरूपाला प्रथम मनोभावे नमनपूर्वक प्रार्थना करू या.

" व्यासोच्छिष्टं जगत् सर्वम् । व्यासो नारायणो साक्षात् । " व्यास महर्षींचे असे वर्णन आढळते. व्यास हे विश्वाचे गुरु होत ते नारायण स्वरूप ! प्रत्यक्ष नारायणच ! ' नारम् ददामि सा नारदाः ॥ ' नारद म्हणजे ज्ञानस्वरुप. वेद म्हणजे ज्ञान. व्यासांनी दशोपनिषदें, गीता व वेदांत सूत्रे यांचा संपूर्ण अभ्यास करून प्रस्थानत्रयी पूर्ण केली. महाभारत हा यांचा अलौकिक ग्रंथ. ज्यांचे या महाभारतात विवेचन नाही. असा एकही विषय नाही. व्यासांची प्रतिभा काही आगळीच होती. ते प्रसिद्ध भाष्यकारही आहेत. ज्ञानदेव त्यांचे वर्णन करतात–' भाष्यकाराते वाट पुसुत '... ' म्हणौनि व्यासाचा थोरू । विश्वासि झाला उपकारू ॥'

पराशर ऋषीस धीवर...कन्या सत्यवतीपासून कौमार्यावस्थेत झालेला पुत्र म्हणजेच व्यास ! ह्यांच्यापासूनच विचित्रवीर्याच्या स्त्रियांस धृतराष्ट्र व पंडु हे पुत्र झाले

व आंबिकेच्या दासीस विदुर झाला. यांनी आपला शिष्य वैशंपायन यांस निमित्त करून जनमेजय राजास महाभारत ऐकविले व शापमुक्त केले! अठरा पुराणांचे कर्तृत्व यांजकडे दिले जाते. वेदांत संहिता आणि वेदांत सूत्रात उपनिषद वाक्यांची संगती लावून दाखविली म्हणून वेदव्यास–बादरायण असेही ह्यास म्हणतात. 'व्यासोच्छिष्टं जगत्त्रयं' असेही म्हणण्याचा प्रघात दिसतो.

गणिताच्या दृष्टीने 'व्यास' याचा अर्थ पाहू गेल्यास व्यासही त्रिजेच्य दुप्पट असतो. संपूर्ण 'विश्व' हा ह्याचा परीघ असून मध्यबिंदू म्हणजेच 'गुरु' (सद्गुरु) हे याचे केंद्र व आपले या दोहोंसी नाते व्यासानी जोडले आहे. परीघावरील व्यासानी जोडलेले दोन बिंदु म्हणजे मानवाच्या आयुष्यातील द्वैत आहे. सुख दुःख, लाभ, हानी, जन्म, मृत्यू ही त्यांचीच प्रतीके असून त्या यातून जर आपणास सुटका करुन घ्यावयाची असेल तर मध्यबिंदूकडे म्हणजेच केंद्राकडे धाव ही घ्यावीच लागेल. केंद्राला अद्वैत अस्तित्व आहे. "सुख-दुःखे समेकृत्वा लाभालाभौ जयाजयो एषा ब्राह्मी स्थिती पार्थ ॥" अशी ही समतोल रहाणी या केंद्राच्या अस्तित्वाशिवाय म्हणजेच गुरुशिवाय लाभूच शकत नाही!

आता 'पौर्णिमा' म्हणजे काय ते पाहू चंद्र हा प्रतिपदे पासून कलाकलानी वाढत असतो. पौर्णिमेस तो पूर्ण प्रकाश षोडष कलानी देत असून याची सत्रावी कला काही और आहे. चंद्र याचा साधकाच्या दृष्टीने अर्थ बघीतला तर 'ज्ञान' होय. 'चंद्रमे जे अलांछन। मार्तंड जे तापहीन। ते सर्वांही सदा सज्जन। सोयरे होतु। किंबहुना सर्वसुखी। पूर्ण होवोनि तिही लोकी। भजीजो आदि पुरुषी। अखंडित ॥" अशी मागणी ज्ञानदेव आपल्या पसायदानात करतात. सद्गुरु हा पूर्ण चंद्र व शिष्य हा चकोर पक्षाप्रमाणे आपल्या गुरुकडून जेवढे ज्ञान ग्रहण करता येईल तेवढे ग्रहण करण्याचा प्रयत्न करत असतो. जो आर्त, जिज्ञासू, ज्ञानपिपासू मूलतःच असतो तोच सत्शिष्य। व आपल्या गुरुकडून चंद्ररुपी ज्ञानकिरण प्रकाशांनी स्वानंद बोधामृत सत्रावीच्या कलेने स्तनपान घेऊन तृप्त होत असतो व पुष्ट व तुष्ट होत असतो. ज्ञानेश्वर याबद्दल सार्थ वर्णन करतात "चिन्मात्र पूर्णिमा गुरुपूर्ण चंद्र। तळी आपण होय आर्त चकोर। मग स्वानंद बोधाचे चंद्रकार। निरंतर स्वयें सेवा ॥"

आता प्रश्न उपस्थित राहतो की पौर्णिमा आहे. ठीक आहे! पण मग आषाढ महिन्यातीलच का? यासच विशेष महत्व का? ते थोडक्यात साकल्याने पाहू. आषाढ महिन्यात निसर्ग अधिक प्रसन्न असतो. नुकताच उन्हाळा संपून ऋतुपण बदलतो. व या महिन्यातील एकादशी 'आषाढ शुद्ध एकादशी' ही देवशयनी एका-

दशी ! चातुर्मास्यारंभ या दिनापासूनच होतो. कार्तिकी एकादशीस (प्रबोधिनी एकादशी ) चातुर्मास समाप्ति होते. या चार महिन्याच्या काळात देव विश्रांतिस जातात. असे समजले जाते. तसेच पंढरपूर यात्रा या मुदतीत होते. पूर्वी योगमार्ग आचरीत असत. सद्याच्या काळात तो आचरण्यास कठीण व ज्ञानमार्ग सर्वांस न पेलण्यासारखा असा असल्यामुळे, ज्ञानदेवांनी अखिल महाराष्ट्रात नाथपंथीय अंतर्गत भागवत धर्म-वारकरी संप्रदाय भक्तिमार्गाचा प्रचार केला. सर्वसामान्याना सोप्यात सोपा भक्तियोग सांगितला. ते म्हणतात.

" योगयाग विधी येणे नोहे सिद्धी । वायांचि उपाधि दंभधर्म ।।
भावेवीण देव न कळे निःसंदेह । गुरूवीण अनुभव कैसा कळे ।।

लोकमान्य टिळकांनी जसे सार्वजनिक गणेश पूजन मोठ्या प्रमाणावर सुरू केले त्याच प्रमाणात किंबहुना अधिकच श्री नारायण महाराज केडगावकर यांनी या गुरुपौर्णिमेचा उत्सव व्यापक स्वरुपात सुरू केला. गुरु आपली शक्ती या दिनी एकातून अनेकांना देत असतो तर समस्त शिष्य सांप्रदाय सद्‌गुरु पूजनाने अनेकातून एक शक्ति ग्रहण करीत असतो. या दिवशी कोणी फूल ना फुलाची पाकळी, द्रव्य, सेवाभावाने शक्य तो दक्षिणा अर्पण करण्याचा प्रयत्न करतात. पण गुरुदक्षिणा ही खऱ्या अर्थाने जो गुरुंनी सांगितलेल्या मार्गावर अखंड वाटचाल करतो, त्यांनी. सांगितलेल्या साधनी सदैव दक्ष असतो तेव्हाच दिल्यासारखी होते. आणखीन खोलात जाऊन विचार केला तर जसे व्यवहारात ' बापसे बेटा सवाई ! ' त्याप्रमाणे ' शिष्यात इच्छेत पराजयेत ' अशी स्थिती जेव्हा प्राप्त होईल तेव्हाच गुरुदक्षिणा अर्पण केल्यासारखे होईल व तीच गुरुचरणी ऋजू होईल !

आता गुरुमहिमा निरनिराळ्या संतानी निरनिराळ्या ग्रंथांत वर्णन केला आहे. गुरुगीता, गुरुचरित्र, ज्ञानेश्वरी इ. अनेक ग्रंथ आहेत. ' आचार्योपसन् ' ज्ञानदेवाइतके दुसऱ्या कोणीच वर्णन केलेले नाही, आणि नुसते वर्णनच त्यांनी केले असे नव्हे तर त्यांचे प्रत्येक शब्द न शब्द अनुभवाप्रत येतात. ज्ञानदेवांचे नुसते नाव जरी काढले अथवा ज्ञानेश्वरीतील कुठलीही ओवी घेतली तरी अंतःकरण उफाळून येऊन प्रेमाश्रू दाटून येतात, असा सद्‌भक्तांचा अनुभव ! कोल्हापूरचे ब्रम्हीभूत श्री. अण्णासाहेब रुकडीकर तथा ' अण्णा ' हे ज्ञानदेवांचे उपासक, तसेच नाथपंथीय अधिकारी ज्ञानेश्वरांचे नाव काढताक्षणीच डोळयाच्या पापण्या पाणावलेल्या व अष्टसात्विक भाग जागृत झालेले अनेकांनी अनुभविले आहे. खुद्द ज्ञानदेवांचीसुद्धा हीच स्थिती आपल्या गुरुबद्दल, निवृत्तिनाथांबद्दल झालेली पदोपदी आढळते.

भागवताच्या एकादश स्कंधात अवधूताने २४ गुरु केल्याचे आढळते. २४ गुरु म्हणजे २४ तत्त्वे आहेत. सांख्यांच्या मते २४ तत्त्वें आणि पंचविसावा पुरुष आत्मा अशी विभागणी विश्वाच्या उभारणी-संहारणींत आढळते. नाथ या विश्वात्मक गुरु संस्थेविषयी भाष्य करताना म्हणतात —

जो जो ज्याचा घेतला गुण। तो तो म्यां गुरू केला जाण।
गुरुंसी आले अपारपण। जग संपूर्ण गुरु दिसे॥
ज्याचा गुण घेतला। तो सहजें गुरुत्वा आला।
ज्याचा गुण त्यागरुपें घेतला। तोहि गुरु झाला अहित त्यागें॥
गुरु महिमा वर्णन करतांना मुकुंदराज सांगतात—
प्रेमें स्फुंदती नित्य। स्मरण विस्मरणेंवीण नेमस्त।
क्षणाक्षणा उच्चारित। नाम गुरुचे॥
गुरु परमेश्वर ऐक्यता। सद्‌रुप जाणोनि भजतां।
सन्मान देता संतां। अति प्रीतीने॥
आणि विश्वामाजी ईश्वर। एकचि व्यापक सद्‌गुरु।
म्हणोनि सर्वांभूती आदरु। करिती ते॥

अशा या गुरुची तन, मन, धन अर्पण करून गुरुवाचून अन्य दैवत नाही अशा पूर्ण श्रद्धेने व सेवाभावाने आचरण केल्यास जीवाची वाटचाल मोक्षाप्रत होऊ शकेल व मानवी जीवनाची इतिश्री, श्रेयस व प्रेयस साधून 'याचि देही याचि डोळां। भोगी मुक्तिचा सोहळां' ही स्थिति गुरुकृपेने प्राप्त करून घेता येईल.

"ऐशी गुरुमार्गींची परवडी। तैशी असावी गुरुपदाची जोडी।
तरी प्रकाश होतां अर्धघडी। न लगे बापा॥"

गुरुगीतेत म्हटल्याप्रमाणे सद्‌गुरु महिमा अगाध, अतर्क्य व अवर्णनीय तसाच अपार व अनंत आहे—

"न गुरोरधिकं न गुरोरधिकं, न गुरोरधिकं न गुरोरधिकम्।
शिव शासनतः शिवशासनतः, शिवशासनतः शिवशासनतः॥"

साईबाबांचे गुरु

# गोपाळराव केशवराज बाबासाहेब महाराज

श्रीसाईबाबांचे निकटचे शिष्य श्रीदासगणू महाराज यांनी भक्तलीलामृत या ग्रंथात सेलूचे आद्य संत श्री गोपाळराव केशवराज बाबासाहेब महाराज हे साईबाबांचे गुरू होते हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. पण पुरेशी माहिती न मिळाल्यामुळे त्यांचे म्हणणे जगाने कदाचित मान्य केले नसेल. श्रीसाईबाबा व त्यांचे गुरू यांना सांधणारा दुवा म्हणजे दासगणू महाराज. त्यांनी रचलेल्या 'संतकथामृत' ग्रंथात श्रीसाईबाबांच्या जीवनावर एक अध्याय (५७ वा) लिहिलेला असून सदर ग्रंथ १९०८ मध्ये परभणी येथील मोगलाई रियासतमध्ये प्रकाशित झाला.

दासगणू महाराजांचा व साईबाबांचा दाट स्नेह होता. त्यांनी पोलीस खात्यातील नोकरी सोडावी असा साईबाबा त्यांना नेहमी आग्रह करीत. शेवटी त्यांनी या नोकरीचा राजीनामा दिला. त्यानंतर बाबांनी त्यांना संतचरित्रे लिहिण्याची आज्ञा होती. या आज्ञेवरून त्यांनी वरील दोन ग्रंथ लिहिले.

## बाबांचे गुरू

श्री गोपाळराव केशवराज बाबासाहेब यांचा जन्म 'जांब' या गावी झाला. यांच्या जन्मासंबंधी अशी एक आख्यायिका प्रचलित आहे की, त्यांच्या वडिलांना केशवराजांना बरेच दिवस मूलबाळ होत नव्हते. याकरिता त्यांनी अनुष्ठान करून श्री व्यंकटेशास प्रसन्न करून घेतले व त्यांच्याकडून पुत्रप्राप्तीचा वर मागून घेतला. व्यंकटेशांनी वर दिला तो असा की, पूर्वीचे काशीचे रामनंदस्वामी तुझ्या घरी जन्म घेतील आणि तेच गोपाळराव बाबासाहेब नावाने लौकिकास येतील.

मुंज, विवाह वगैरे झाल्यावर धर्मार्जन करण्यासाठी गोपाळराव घरातून बाहेर पडले. फिरता फिरता ते सेलूस (जिल्हा परभणी) आले [इ. स. १८३०] त्यावेळी तेथे गवताने बांधलेल्या दोन तीन झोपड्याच फक्त दिसत होत्या. गोपाळरावांना थांबावयास जागादेखील नव्हती. पण त्यांनी मनाशी ठरविले की, आपणास रहावयास हीच जागा योग्य अशी आहे.

मग त्यांनी क्षणभरही न थांबता कामास सुरुवात केली. तेथील गढीचे डागडुजी व दुरुस्तीचे काम त्यांनी सुरू केले. आजुबाजूच्या लोकांना आणून तेथे रहावयास त्यांनी उद्युक्त केले. स्वकर्तृत्वाने त्यांनी पूर्वीच्या 'सेलवाडी'ची सेलू केली व जिंतूर परगण्यामध्ये जहागिरी आणि देशमुखी मिळविली. गोपाळराव तेथील जमेदार झाले. परंतु सर्व लोकांशी ते दबावाने न वागता प्रेमाने वागत.

## विचित्र घटना

एक दिवस एक विचित्र घटना घडली, त्यांनी दुरुस्त केलेल्या गढीमागे एक स्त्री शौचास येऊन बसली होती. ती स्त्री तरुण होती. दिसावयास अतिशय सुंदर. वेळ सायंकाळची. सूर्य मावळतीकडे झुकलेला. नेमके त्यावेळीच गोपाळराव बुरुजावर गेले अन सहज त्यांची दृष्टी त्या तरुण स्त्री वर गेली. त्या स्त्रीला पहाताच ते सर्व काही विसरून विस्मयाने आश्चर्यचकित होऊन गेले. ते अलौकिक सौंदर्य न्याहाळत उभे राहिले. डोळ्यासमोर फक्त ती स्त्रीच दिसू लागली व त्यांची कामवासना उफाळून वर आली.

तेवढ्यात ते भानावर आले. थंड वाऱ्याची झुळुक त्यांच्या घामाने ओथंबलेल्या शरीरास लागली. मग ते स्वतःलाच दोष देऊ लागले. 'अरेरे! किती मी पापी धिक्कार असो. एका परस्त्रीला पाहून मी मोहवश व्हावे केवढा हा अधःपात!' तत्काळ त्यांनी मनाशी एक कठोर निश्चय केला व तत्क्षणीच ते खाली देवघरात आले. तेथे पडलेले दाभण उचलले. 'नको हे पापी डोळे' म्हणून त्यांनी दोन्ही डोळे फोडून टाकले. तेव्हाच त्यांच्या मनाला शांती मिळाली.

गोपाळरावांनी डोळे फोडून घेतले ही बातमी वाऱ्यासारखी सर्वत्र पसरली. लोकांच्या झुंडीच्या झुंडी गोपाळरावांना पहावयास गर्दी करू लागल्या. लोकच ते काही काही बोलू लागले त्यांना वेड लागले असावे. उगीच सुखासुखी कुणी डोळे फोडून घेईल काय! असे ते बोलू लागले. याउलट घडलेल्या प्रकाराने काही लोकांचा महाराजांविषयी आदरभाव वाढीस लागला. तेथून पुढे लोक त्यांना महाराज म्हणू लागले. दूरदूरचे लोक त्यांच्या दर्शनास येऊ लागले.

एक दिवस एक अंध स्त्री त्यांचे दर्शन घ्यावयास आली. तिने महाराजांचे पाय धरले व मला दृष्टी द्यावी असे ती महाराजांना विनवू लागली. 'हे दयासागरा मला माझी दृष्टी परत मिळवून दे. तोपर्यंत हे पाय मी सोडणार नाही. तिची श्रद्धा व अढळ विश्वास पाहून महाराजांच्या हृदयात दया उत्पन्न झाली. त्यांनी जवळच तिखट कांडीत बसलेल्या मोलकरणीजवळून मूठभर तिखट घेतले व त्या स्त्रीच्या दोन्ही डोळ्यात घातले. चमत्कार असा झाला की, त्या स्त्रीला पुन्हा स्पष्ट दिसू लागले. यामुळे त्यांची कीर्ती आणखीनच वाढली.

## बाबांच्या जन्माचा संदेश

काही दिवसांनी महाराजांनी काशी यात्रेस जाण्याचे ठरविले, सोबत बरीच मंडळी निघाली. काशीहून महाराज गया, प्रयाग, कुरुक्षेत्र, वृंदावन गोकुळ, मथुरा,

द्वारका, सोमनाथ, प्रभासपट्टन, जुनागड करून ते अहमदाबाद येथे आले. तिथे सुहाग शहाचे दर्शन घेण्यासाठी महाराज दर्ग्यात गेले तो तेथे एक अद्भुत प्रकार घडला. महाराज दर्ग्यात येताच कबरीतून एक आवाज यायला लागला. 'सलाम अलेक.' 'हे पूर्वजन्मीच्या भक्तश्रेष्ठा रामानंदा तुम्ही अजून मला विसरला नाहीत. आपण मोगलाईत देशमुख झाले असले तरी मी देखील तुम्हास ओळखले आहे. हे दयासागरा, सेलूजवळ १० मैलांवर पाथरी नावाच्या गावात तुमचा शिष्य कबीर जन्म घेणार आहे.' यानंतर आवाज यायचा बंद झाला. बरोबरचे लोक हा प्रकार पाहून आश्चर्यचकित झाले पण महाराजांना हे सर्व ज्ञात होते.

पुढे महाराज सेलूस परत आले. एके दिवशी पाथरीहून एक मुलगा आईला बरोबर घेऊन गोपाळरावांकडे आला त्यांनी त्यांना आनंदाने आश्रय दिला. गोपाळरावांना उत्तमपैकी संस्कृत येत होते. त्याचा लाभ त्या मुलाला देखील झाला. महाराज त्याला आपल्या जवळील सर्व विद्या शिकवत राहिले व योगासनाने व ध्यानधारणेचे धडे देत राहिले. मुलगा कुशाग्र बुद्धीचा असल्यामुळे सर्व आत्मसात करीत गेला. त्यामुळे महाराज जास्तीत जास्त वेळ त्याच्यासाठी खर्च करू लागले.

## बाबांच्या खुनाचा प्रयत्न

गोपाळराव जनमान्यता पावलेले महाराज होते. त्यामुळे त्यांचा शिष्य व चाहता वर्ग निर्माण झालेला होता. त्यांना पूर्वी वेळ मिळत होता. पण हा मुलगा आला तेव्हापासून त्यांच्या सहवासाचा मंडळींना कमी लाभ होऊ लागला. हे सर्व त्या मुलामुळेच घडू लागले म्हणून सहाजिकच त्या मुलाबद्दल त्यांच्या मनात द्वेषाची भावना मूळ धरू लागली. हे बाबासाहेबांच्या लक्षात आले. त्यामुळे ते त्या मुलाला घेऊन त्यांच्या मालकीच्या उमरखेडच्या किल्लेवजा गढीवर रहावयास गेले.

मुलाची जातपात माहीत नाही, पण तो यवन असावा असा संशय व महाराज तर ब्राह्मण. या दोघांचे घनिष्ट संबंध त्यांच्या शिष्यांना रुचण्यासारखे नव्हते. तशात बाबासाहेब त्या मुलाला घेऊन सेलू सोडून निघून गेल्याचा परिणाम भक्त मंडळीवर फारच विपरित झाला. त्यांनी मुलाला जिवे मारण्याची योजना आखली.

निवडक लोक मिळून उमरखेडला गेले. एका रात्री बाबासाहेब मुलाला घेऊन निजले असताना संधी साधून त्यांनी त्या मुलास मारण्यासाठी त्याच्या मस्तकावर दगड घातला. मोठी वीट घातली असेही म्हणतात याच विटेचा तुकडा बाबांच्या मासधीत ठेवण्यात आलेला आहे पण तो चुकून मुलाऐवजी बाबासाहेबांनाच लागला.

त्यांच्या डोक्याला जखम होऊन रक्ताची धार लागली. रक्तस्राव थांबविण्यासाठी त्या मुलाने बाबासाहेबांचे उपरणे त्यांच्या डोक्याला बांधले. ते सर्व रक्ताने भरले.

डोक्यांत दगड घालण्यामागे कोणाचे हात आहेत व त्यांचा हेतू काय हे त्या मुलाला कळायला वेळ लागला नाही, आपल्यामुळे गुरुला त्रास झाला याचे त्या मुलाला अतोनात दुःख झाले. आपल्याला बाबासाहेबांजवळ राहू देण्याची लोकांची इच्छा नाही, पुढेही असेच प्रसंग येतील आणि आपल्या गुरुला त्रास होईल म्हणून त्याने गुरुजवळ न राहण्याचा निश्चय केला व तसे त्यांना बोलून दाखविले.

## वांझ गाईला दूध

लोकांच्या मनातील भावना ओळखून त्या मुलाला पुढेही ते त्रास देतील किंवा पुनः जिवे मारण्याचा घाट घालतील हे महाराजानीही ओळखले. शिवाय डोक्यावर झालेल्या भयंकर जखमेमुळे मरणाची अशुभ सूचनाच त्यांना मिळाली. यामुळे आपल्या पश्चात या मुलाचे काय होणार हा प्रश्नही त्यांचेपुढे निर्माण झाला. त्याचे म्हणणे महाराजांनी ऐकून घेतले व मग ते त्याला म्हणाले—

' आज मी तुला माझे सर्वस्व देत आहे. तुझा व माझा काय अधिकार आहे हे या सर्व मूर्ख लोकांना दाखवून देतो. जा समोरच्या लमाण तांड्यातून त्या कपिला गाईचे दूध काढून घेऊन ये. '

हे ऐकताच तो मुलगा धावतच तांड्यात गेला व त्याने कपिला गाईचे दूध काढण्याचा विचार लमाण्यास सांगितला. त्यावर लमाणी म्हणाला, ' ही गाय तर वांझ आहे. बैलाप्रमाणे आजपर्यंत मी हिचा सांभाळ केला. '

मग त्या हुल्ला नावाच्या लमाण्याने ती कपिला गाय महाराजांजवळ आणून उभी केली व दोन्ही हात जोडून तो म्हणाला, ' देसाई महाराज, हिच्यापासून कोठून दूध मिळणार ? आज दहा वर्षांपासून ही गाय वांझ आहे. आपली खात्री पटावी म्हणून तिला येथपर्यंत आणले. '

त्यावर महाराज म्हणाले, ' मूर्ख आहेस तू. हिच्या कासेला तू ओळखलं नाहीस. तिनं आत कास केलेली आहे. जा लवकर भांडे घेऊन ये. मीच तुला तिचे दूध काढून दाखवितो. '

टमरेल हातात घेऊन महाराज दूध काढायला निघाले. प्रथम त्यांनी गायीच्या पाठीवर प्रेमळपणे हात फिरवला व मग कासेत हात घालताच ती गाय पान्हवली. तेथील सर्व लोक व लमाणी हे पाहून आश्चर्यचकित झाले. तीन शेर दूध निघाले. '

## महाराजांचा अनुग्रह

महाराजांनी मुलाला हाताला धरून जवळ बसविले व म्हटले, 'मुला आता हे दूध पिऊन टाक. हे दूध पिताक्षणीच तुला ज्ञान प्राप्त होईल. हे तीन शेर दूध म्हणजे कर्म, भक्ती व ज्ञान आहे.'

हे ऐकून मुलाने दूध पिऊन टाकले, मुलाला हृदयाशी कवटाळून महाराज म्हणाले, 'तू पूर्वजन्मीचा कबीर पुन्हा जन्म घेऊन आला आहेस हे विसरू नकोस. मागच्या जन्मी संतांच्या सेवेसाठी तू आपली पत्नी वाण्यास दिली होतीस. म्हणून तू ब्रह्मचारी राहा. त्यावेळी तू खूप भजन केलेस. पण आता मौन पाळण. एकाच ठिकाणी वास्तव्य कर. शरणांगतांस उद्धरून टाक.'

याप्रमाणे त्यांनी मुलास उपदेश केला. डोक्यावर जखमेस बांधलेले रक्तलांच्छित उपरणे सोडून त्या मुलाच्या डोक्यास फकीर बांधतात त्या पद्धतीने बांधले. सर्व मिळून परत सेलूस आले.

दगडांच्या घावामुळे महाराजांचा शेवटी देहान्त झाला. त्यांच्या मृत्यूची निश्चित तिथी आढळून येत नाही. परंतु दासगणूंनी लिहिलेल्या त्यांच्या चरित्रात मार्गशीर्ष महिन्यात एकादशीच्या दिवशी बाबासाहेबांचे प्राणोत्क्रमण झाले असा उल्लेख आढळतो. यावेळी साईबाबांचे वय २० असावे.

सेलूत गोपाळरावांची समाधी बांधण्यात येऊन तीत व्यंकटेशाच्या मूर्तीची स्थापना करण्यात आली. त्यांच्या समाधीच्या जागी एक पिंपळ निघाला. नित्यनियमाने व दर शुक्रवारी बरेच भाविक लोक समाधीच्या दर्शनास येतात. सेलू येथे सध्या महाराजांची सातवी पिढी रहात आहे. प्रतिवर्षी येथे फार मोठी यात्रा भरते.

महाराजांच्या मृत्यूच्या घटनेचा त्या मुलावर फार जबरदस्त आघात झाला. हाच मुलगा पुढे शिर्डीस साईबाबा या नावाने महान संत होऊन गेला.

आपण आपल्या गुरूच्या मृत्यूस कारणीभूत ठरलो या जाणीवेनं त्याच्या मनात घर केलं. त्यामुळे पुढेही इतरांजवळ त्यानं आपल्या गुरूचा उल्लेख करणं प्रकर्षानं टाळलं. गुरूचा उल्लेख आलाच तर गुरूचे नाव न सांगता व्यंकूजी शहा त्याचा धर्म पंथ इत्यादी बाबींचा उल्लेख करीत. त्यांची वृत्ती पुढे विरक्त व विक्षिप्त का बनली त्याचे कारण या शोकमय पार्श्वभूमीत सापडते.

# सद्गुरुस्तवन हेच सर्वोत्कृष्ट पूजन

—प्रा. र. श्री. पुजारी
रमानिवास, ९९२ सदाशिव पेठ पुणे ३०

● परब्रह्म मूलतः निर्गुण–निराकार सद्गुरुंच्या रूपाने मानव देहात अवतीर्ण होऊन ते सगुण–साकार होते. साहजिकच मानवी व्यवहाराचे पूजा, नैवेद्य, आरती, गीत–वाद्य आदीकरू संकेत त्यालाही लागू होतात. सद्गुरूही हे पूजोपचार लोकसंग्रहार्थ स्वीकारतात. याचे कारण त्या सर्वात्मक सर्वेश्वरांच्या सर्वसुलभ उपासनेचा हाच एक राजमार्ग असतो. या मार्गाने गेल्यास अनन्यभाव वाढीस लागतो. इतकेच नव्हे तर मूर्ती आणि पोथी यांच्या पलिकडे असलेला परमात्मा याच वाटेवर अकल्पितपणे भेटतो.

मूर्ती आणि पोथी ही दोन्ही परस्परास पूरकच असतात. सद्गुरुंच्या ठायी अनन्यभाव निर्माण करणारी ही दोन साधने होत. भक्ती कितीही फोफावली तरी अनन्यभावाचे मधुर फळ तिला येईलच असे नाही. म्हणूनच श्रीरामकृष्ण परमहंसासारखे परम सद्गुरु संत भक्तीपेक्षा भक्तिभावालाच अधिक प्राधान्य देतात. 'भावा' च्या प्रतीवरून भक्तीमधील प्रगती ते अजमावितात. भगवंताच्या नावामुळे, रूपामुळे चिंतनामुळे कंठ सद्गदित होणे, डोळ्यात अश्रू येणे, थोडक्यात म्हणजे अष्टसात्त्विक भावांची जागृती होणे हे भक्तीच्या पक्वतेचे लक्षण होय. आंब्यासारखे फळ पाडास येणे, त्याची सुव्यवस्थित आढी घातली जाणे आणि यथाकाळ पक्व होऊन रसमय, गंधमय फळ हाती येणे हीच प्रक्रिया भक्तांच्या पक्व भक्तीबद्दल सांगता येईल. भावनिर्मिती ती हीच होय.



भावनिर्मितीत सद्गुरुंच्या पार्थिव पूजेपेक्षा मानसपूजेसच अधिक महत्त्व असते. याचे कारण सद्गुरुंच्या चरणांशी देहाने उपस्थित असण्यापेक्षा मनाने चिकटून राहणेच श्रेयस्कर ठरते. साहजिकच सद्गुरुंच्या रूपापेक्षा त्यांच्या गुणांचे चिंतन भक्तांना अधिक उपयुक्त. याचे कारण गुणांचे मूल्य अक्षय्य असते. त्यांची भावशक्ती अनन्यसाधारण असते. गुणांमुळेच जग जगते. पुढे चालू राहाते. दीपामुळे दीप प्रज्वलित व्हावा अशी ही शक्ती आहे. सद्गुरुंचे गुण हा तर साक्षात् प्रकाश आहे. अर्थातच प्रकाशरूप असलेल्या सद्गुरुंच्या गुणांचे स्तवन हाच त्यांच्या पूजेचा सर्वोत्कृष्ट मार्ग आहे.

म्हणूनच सद्‌गुरूंच्या गुणांचे स्तवन त्यांच्या नित्य नैमित्तिक पूजापाठात किंवा उपासनेत दिसून येते. आरती, पालखी, कीर्तन, भजन, प्रवचन तर सद्‌गुरूंच्या गुण-स्तवनाविना होऊच शकत नाही. त्यातही भक्ताची भावनाच श्रेष्ठ असते. "मैं अंधा हूँ, मैं बंदा हूँ, मैं तुम्हारे मशीदका झाडू हूँ" अशा आर्त भावाने सद्‌गुरूंचे स्तवन करणे म्हणजे भक्तीचे अत्युच्च शिखर गाठणेच होय.

रक्तात मुरलेला भक्तिभावच अपरिहार्यपणे सद्‌गुरू स्तवनपर कवनात उतरत असतो. अंतःकरणातील अनन्यभावापोटीच हा शब्दरूप आविष्कार घडतो. येथे अंतःकरण ओतून, शरणागत होऊन, स्वदोषांची प्रांजल कबुली देऊन करुणेची याचना भक्त करीत असतो. कविवर्य मोरोपंत यांची केकावली, जगन्नाथाचे गंगालहरी परम साईभक्त सत्कवी बाळकृष्ण विश्वनाथ उर्फ डहाणूचे देव मामलेदार यांचे "रुसो न गुरू साईनाथ" हे स्तोत्र ही या प्रकारची उदाहरणे होत.

सद्‌गुरूंच्या स्तुतिपर कवनांच्या नित्य गायनाने आणि श्रवणाने तरल अंतःकरणाच्या व निर्मल मनाच्या व्यक्तींच्या अंतःकरणात भक्तीचे बीज निर्माण होऊ शकते. तीच भक्ती पुढे तीव्रतम बनून 'भाव' रूप बनते. कवित्वाला 'पर' तत्वाचा स्पर्श येथे घडतो.

नदी आणि नरहरी या दोन गुरुभक्तांची तळमळ गुरुस्तवनपर कवने लिहिल्या-मुळेच 'भाव' रूप होऊन श्रीसद्‌गुरूंनी त्यांच्यावर कृपा केली. सायंदेव हा अनन्य गुरुभक्तही उत्स्फूर्तपणे कन्नड भाषेत दोन श्रीगुरुस्तवनपर कवने करून कृपाप्रसादयुक्त होतो, असा उल्लेख श्रीगुरुचरित्रात आढळून येतो. परंतु याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट अशी की गुरुस्तवन श्रीगुरूंना इतके प्रिय असते की स्वमुखानेच स्वतः श्रीगुरू स्वामी नरसिंह सरस्वती नरहरीस सांगतात की नरहरी, कवनरूपाने तू आमचे स्तवन कर म्हणजे अंगास असलेला कोडाचा तो डागही नाहीसा होईल.

# गुरुबद्दल स्वतः श्रीसाईबाबा काय म्हणतात

—श्री. अनंत पै काणे
ई।६०९ डॉ. दादा वैद्य रोड
पणजी (गोवा) ४०३००१

## ‘तद्विद्धि प्रणिपातेन’ या गीताश्लोकाचे श्रीमुखीचे विवरण

● श्री. नानासाहेब चांदोरकर हे एक थोर साईभक्त होऊन गेले. श्रीसाईबाबांनी आपल्या आयुष्यातली जवळजवळ ६० वर्षे शिरडीत घालविली. पण त्यांचे महात्म्य शिरडीबाहेरच्या लोकाना कळले ते चांदोरकरांमुळेच. गणपत सहस्रबुद्धे या एका हेड कॉन्स्टेबलला श्रीबाबांच्या कृपेस पात्र करून त्यांना ‘दासगणू महाराज’ या नावाने कीर्तनकार बनविले ते पण चांदोरकरानीच. स्वतः चांदोरकर व नंतर श्रीदासगणू महाराज या दोघांनी श्रीबाबांची कीर्ती सर्वत्र पसरविली व लोकांचा लोंढा शिरडीच्या दिशेने वाहू लागला तो आजतागायत, श्रीबाबांचे देहावसान होऊन ६२ वर्षे झाल्यानंतरही, अविरतपणे चालू आहे.

असे हे भक्ताग्रणि चांदोरकर एकदा श्रीबाबांचे पादसंवाहन करीत असताना तोंडाने काहीतरी गुणगुणत असल्याचे पाहून श्रीबाबांनी त्यांना विचारले, ‘अरे नाना काय गुणगुणतो आहेस, जरा मोठ्याने तरी म्हण. आम्हाला पण ऐकू दे.’ यावर नाना अदबीने म्हणाले ‘काही नाही बाबा, सहज गीतेचा पाठ म्हणत होतो. असे का, छान! श्रीबाबा उद्गारले, व जो श्लोक नाना गुणगुणत होते तो मोठ्याने म्हणण्यास व त्याचा अर्थ विशद करण्यास त्यांना सांगितले.

श्री बाबांच्या आज्ञेनुसार चांदोरकरांनी खालील गीताश्लोक मोठ्याने म्हणून दाखविला :

“ तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।
उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥ ”
(अ. ४ श्लो. ३४)

हा मूळ श्लोक म्हणून झाल्यावर नानांनी आपल्या परिने अर्थ सांगण्यास सुरवात केली. म्हणाले ‘जो कोणी गुरुपदी प्रणिपात करून, स्वतःचे जीवित गुरुसेवेस

वाहातो व आदराने प्रश्न पुसून स्वतःचे समाधान करून घेतो, त्याला ज्ञानीजन ज्ञानोपदेश करतात.' असे सांगून नाना पुढे म्हणाले, बाबा, माझ्या माहितीप्रमाणे गीतेच्या सर्व भाष्यकारांनी गुरुसेवा, गुरुप्रणति ही ज्ञानसंविच्चिदायक असल्याचे स्पष्ट पणे सांगून जो कोण ह्या मार्गाने जाईल त्याला तत्त्वदर्शी ज्ञानी ज्ञानाचा रस्ता जरूर दाखवितील असे स्पष्टपणे आश्वासन दिले आहे.

श्रीबाबांनी हे स्पष्टीकरण ऐकून घेतले व म्हणाले, पहिल्या दोन चरणांचा अर्थ मला मान्य आहे, पण उत्तरश्लोकार्धाचा जो अर्थ तू सांगितलास तो माझ्या मते बरोबर नाही. 'उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः' ह्या चरणात 'ज्ञान' शब्दा ऐवजी 'अज्ञान' घेतला पाहिजे. वास्तविक हा चरणच 'उपदेक्ष्यंति तेऽज्ञानं ज्ञानिन स्तत्त्वदर्शिनः' असा असावयास हवा. अरे, असे पाहा 'ज्ञान' हा काय बोलाचा विषय आहे, म्हणून त्याचा उपदेश करता येईल? 'ज्ञान' हे शब्दातीत असून 'अज्ञान' मात्र उपदेशाचा विषय होऊ शकतो. भगवंतांनी गीतेत स्पष्टपणे सांगून ठेवले आहे की, 'ज्याप्रमाणे गर्भ वारेने वेष्टिलेला असतो किंवा आरशावर मळ साचलेला असतो तसेच ज्ञान हे अज्ञानाने वेष्टिलेले असते. अज्ञान दूर केले गेले की, ज्ञान स्वयंप्रकाशू लागेल. लक्षात ठेव की 'ज्ञान' ही जाणावयाची वस्तू नाही तसेच ती उपदेशाची पण नाही. फक्त प्रणिपात, परिप्रश्न, सेवा ह्या गुरुकृपेच्या साधनांच्या माध्यमाने त्याचा उदय प्रत्येकाच्या अंतःकरणात होऊ शकेल. आपल्या ह्या विधानाच्या स्पष्टीकरणार्थ रज्जू-सर्प, सुवर्ण-काट (सुवर्ण-गोंज) वगैरे उदाहरणे देऊन श्री बाबा म्हणाले, सारांश, अज्ञानाचा समूळ नाश झाल्यावर जे उरेल ते शुद्ध 'ज्ञान' असेल हेच वर उद्धृत केलेल्या श्लोकाचे हृद्गत आहे.

हे गोड निरूपण ऐकून चांदोरकरांनी श्री बाबांच्या चरणी लोटांगण घातले व दोन्ही हातांनी त्यांचे चरण वंदिले.

वरील कथा 'श्रीसाईसच्चरित' ह्या श्रीसाईबाबांच्या चरित्रग्रंथात अध्याय ३९ मध्ये आलेली आहे. ज्या अभिनव पद्धतीने वरील श्लोकाचा श्रीबाबांनी अर्थ विशद केला त्यावरून त्यांचे संस्कृत भाषेवरील प्रभुत्व दिसून येते.

# सद्गुरु दर्शन

☆ ☆

–श्री. र. शं. जुन्नरकर
प्रशांती प्रकाशन, वसंत अपार्टमेंटस,
बोरीवली

[ दिव्यत्वाची येथे प्रचिति ! या श्री उपासनी आश्रमावरील प्रदीर्घ वर्णनात्मक आगामी पुस्तकाचे हे पहिले प्रकरण : लेखक : श्री. रघुनाथ शं. जुन्नरकर ]

● कितीतरी वर्षे झाली असतील त्या गोष्टीला ! तो दिवस मला आठवत नाही, ते सालही मला स्मरत नाही. पण त्या दिवसाची आठवण मात्र आजही माझ्या अंतःकरणात ताजी टवटवीत आहे ! माझ्या जीवनातील ती महत्त्वपूर्ण घटना, त्यातील बारीक सारीक गोष्टीसुद्धा अजूनही जिवंतपणे माझ्या नजरेसमोर तरळत आहेत. कारण माझी सद्गुरू माऊली–माझ्या गोदामाचं पहिलं दर्शन मला त्या दिवशी झालं !

माझं अंतःकरण अत्यंत अस्वस्थ होतं, हृदय निर्जीव भावनाशून्य झालेलं होतं माणसाला भविष्यकालाचं आश्वासन देऊन जिवंत रहायला लावणारी आशाही माझ्या जीवनातून विराम पावली होती ! फार काय माझ्या मनाची हरपलेली शांती मला परत लाभावी ही मनोमय इच्छाही मी गमावून बसलो होतो आणि मनाची शांती नष्ट होणं हा माणसाचा मोठ्यातला मोठा पराजय ! त्याला मरेपर्यंत सलणारी मानखंडना ! त्याच्या स्वाभिमानी मनाचा हा अखेरचा तपोभंग होय !

अशा विचारांनी जड झालेल्या अंतःकरणानं भारभूत झालेले माझे पाय कच्च्या धूळकट रस्त्यावरून मला प्रथमच साकोरी गावाच्या परिसरात घेऊन चालले होते. काहीच हालचाल न दर्शविणाऱ्या त्या गावाजवळ माझी पावलं पडली तेव्हा नुकत्याच उगविणाऱ्या सूर्यनारायणाची कोवळी कोवळी सोनेरी किरणं या भूमीवर दिव्य शांतीची वर्षा उधळीत होती. त्या उगवत्या सूर्याला भावमधुर गुंजारवाची गीतांजली अर्पण करून पक्षीगण इथल्या वातावरणाला अनुसरून जणुकाय धीरगंभीर भूप रागाचे सुरेल संगीत आळवीत होते. आपल्या हलक्या फुलक्या संथ वाहण्यानं पहाटेचा थंड वारा आपल्या बरोबरच आसपासच्या शेतातून उभ्या असणाऱ्या

पिवळ्या पिवळ्या पिकांना फूलबागातून पसरलेल्या रंगीबेरंगी गालीच्यातून वर डोकावून सुगंध उधळणाऱ्या फुलझाडांना आणि मोठमोठ्या वृक्षराजींची शोभा वाढविणाऱ्या हिरव्यागार पल्लवीला–आपआपल्या तालबद्ध सळसळीनं आनंदानं झुलायला लावीत होता! इतकं असूनही एरवी निसर्गाच्या सान्निध्यात अन् संगीतात बहरून डोलणारं माझं मन या निसर्गरम्य शांतीची अनुभूति अनुभवत नव्हतं! जीवनातून उठलेल्या माझ्यासारख्या निराश माणसाला त्या प्रशांत वातावरणात रम्यता वाटली नाही, निराळेपणा दिसला नाही कि कोणतंच आकर्षण आढळून आलं नाही. काहीही घडलं नाही, काही होईलसंही वाटलं नाही! अशा विमनस्क स्थितीत मी गावातील शेवटच्या घराला वळसा दिला आणि जाणाऱ्या वाटेवरून आगेकूच करण्यासाठी पाऊल पुढे टाकलं–आणि काय आश्चर्य! एका विस्मयजनक दृश्यानं माझी नजर आणि पावलं जागच्या जागी खिळून गेली! माझ्या उजव्या हातालाच सुंदर रंगांची उधळण करून डोळ्यांचं पारणं फेडणाऱ्या एका दत्त–मंदिराचा दर्शनी भाग आणि प्रवेशद्वार मला आत येण्यासाठी आवर्जून सांगताहेत असं वाटलं. समोर दृष्टि गेली–तिथं काही अंतराकर श्री सदगुरु उपासनी महाराजांच्या कन्याकुमारी आश्रमाचे आकर्षक प्रवेशद्वार दिसून आलं. डाव्या हाताला दृष्टी वळली तिथं पावित्र्यदर्शक पांढऱ्या शुभ्र रंगानं शोभायमान होणारी भक्तांची लहानमोठी निवासस्थाने ओळीने आश्रमाच्या प्रवेशद्वारापर्यंत आपला घरसंसार मांडून उभी असलेली दिसून आली. त्या घराना लागून समोरच एका महान जुनाट वट-वृक्षाच्या सभोवार पसरलेले विशाल पटांगण त्या झाडाच्या पारंब्यावरून वर खाली बागडणाऱ्या दोन खारींची क्रीडा पहात विसावलं होतं. त्या पारंब्याना जवळ जवळ स्पर्श करून उभे असणारे चौथऱ्यावरचे एक लहानसं समाधि-मंदीर या सर्व परिसराची शोभा वाढवीत होते. त्या देवळाखाली साईबाबांचे एक श्रेष्ठ भक्त बापूसाहेब जोग यांचं शरीर चिरविश्रांती घेत पडलं होतं. साईबाबांच्या महासमाधिनंतर उपासनी महाराजांची सेवा करण्यासाठी इथं येऊन राहिलेल्या या महात्म्यानं याच ठिकाणी आपला देह ठेवला होता. माझ्या मेलेल्या कलावंत मनाला न कळत चैतन्य पाजणाऱ्या या सर्व दृश्यात याच परिसरात काहीतरी दैवी, काहीतरी अध्यात्मिक, काहीतरी अलौकिक असावं असं माझं मन मला ग्वाही देऊ लागलं. माझ्या अस्वस्थ अंतरात्म्याला शांती लाभेल, निराकार आनंद देईल असा दयासिंधू, अशी साक्षात् ब्रम्हस्वरूप तेजोमय जिवंत ज्योत या ठिकाणी तेवत असलीच पाहिजे असं राहून राहून मनाला वाटू लागलं. असल्या या विचारानंच केवळ माझ्या कल्पनेनं निर्माण केलेल्या माझ्या परमेश्वर स्वरूप माऊलीला ताबडतोब कडकडून मिठी मारण्यासाठी मन नाचू लागलं–बागडू लागलं, कन्याकुमारी आश्रमाच्या प्रवेशद्वाराकडे वेगानं धाव घेऊ लागलं!

पण हाय ! माझ्या मानसिक यातना जणुकाय वाढविण्यासाठीच आश्रमाचं प्रवेशद्वार यावेळी उघडलेलं नव्हतं. कारण अजून दर्शनाची वेळ झालेली नव्हती. मनाचं समाधान करण्याचा प्रयत्न केला. 'वेड्या कशाला जीवाचं रान करतोस ? थोडा वेळ थांब. जीवनाचं अंतिम कल्याण करणारी मनःशांति आजच तुला लाभणार आहे ! दिव्यत्वाचा साक्षात्कार तुला घडविणार आहे ! दिव्यत्वाची प्रचिती तुला इथंच मिळणार आहे !' त्या प्रचितीची प्रतिक्षा करायचं ठरवून हिरमुसलेल्या माझ्या मनाला मी आवर घातला.

घाईघाईने मी माझे प्रातर्विधि आटोपले अन् मला त्या महान क्षणाचा साक्षात्कार घडविणारी आश्रमाची ती दारे केव्हा उघडतील याची वाट पाहत बसलो. माझ्या जीवनातील इतकी वर्षे मला यातना भोगायला लावून आपल्या पायापासून दूर ठेवणाऱ्या माझ्या ईश्वर स्वरुप सद्गुरु माऊलीला आत जाऊन कोनाकोपऱ्यातून हिंडून मी केव्हा शोधून काढीन असं मला झालं होतं !

अन माझ्या पूर्व पुण्याईचा जन्मजन्मांतरातून वाट पाहिलेला तो सुवर्ण क्षण जवळ येऊन ठेपला !

निराशेनं बंद करून घेतलेली दारे पुनर्जन्म झालेल्या माझ्या आशेनं येऊन उघडली ! अन पृथ्वीवरील मानवरूपी देवतांच्या मंदिरात, श्री. उपासनी महाराजांच्या कन्याकुमारी स्थानात माझं पहिलं पाऊल पडलं ! श्री बाबांच्या 'झोपडी' म्हणून प्रसिद्ध असलेल्या दालनात मी प्रथम शिरलो आणि माझी नजर इतस्ततः भिरभिर भटकून माझ्या परमेश्वराचा शोध घेऊ लागली. झोपडीत महाराजांचा नश्वर देह त्यांच्या पवित्र संगमरवरी पादुकांच्याच खालीच त्यांचे पाय येतील अशा स्थितीत समाधिस्त केला गेलेला होता. मागे पिंजऱ्यात त्यांच्या शरीरावरच त्यांचा सुंदर संगमरवरी पुतळाही येणाऱ्या जाणाऱ्या भक्तांकडे आपुलकीनं पहात बसला होता. भावनोद्वेगानं भारावलेलं माझं मस्तक मी त्या दोन दगडी चरण कमळावर ठेवलं. आणि ती पावलं दगडाची नसून दिव्यत्वाची उब देणारी, जिवंत हालचाल करणारी, रक्तामासाचीच असावीत असं राहून राहून मला वाटू लागलं ! मनात विचार आला या दोन पावलांखाली महानिद्रेचा आभास निर्माण करून पडून राहणारा हा महात्मा माझ्या हृदयात खोलवर सलणाऱ्या व्यथेचं गाऱ्हाणंच ऐकून घेत आहे. अनेक वर्षांनंतर छे ! छे ! आपल्या मूळ दिव्य स्वरूपापासून अनेक जन्म मला दूर केल्यानंतर प्रथमच आज आपल्या मायेचा हात माझ्या पाठीवरून फिरवून त्या परमात्म्याचं प्रेम मला परत मिळवून देण्यासाठी या सत्पुरुषानं मला जवळ ओढलं होतं. माझी लायकी नसताना त्यानं हा माझा सन्मान केला म्हणून माझं

मन कृतज्ञतेच्या भावनेनं भरून आलं आणि हृदयातील भावना डोळ्यातून घळघळ वाहणाऱ्या अश्रूंची श्रद्धांजली घेऊन त्या दोन पादुकांवर अभिषेक करू लागल्या! सत्पुरुषाची पावलं न्हावून निघाली! या महात्म्याच्या जीवनावधितच या जन्मीचं दुःख मी भोगत असताना त्याच्या पवित्र चरण कमलांपाशी मी पोहोचू शकलो नाही याबद्दल स्वतःलाच दोष देऊन माझ्या अस्पर्श स्पर्शाचा पादुकांना स्पर्शाबद्दल क्षमा मागून मी तिथून या महान् सत्पुरुषानं जगत् कल्याणासाठी उभारलेल्या त्यांच्या सुंदर आश्रमाचं संपूर्ण अवलोकन करण्यासाठी बाहेर पडलो.

श्री बाबांनी अत्यंत विचार आणि काळजीपूर्वक मांडणी केलेल्या या आश्रमातील लहान सहान गोष्टींचा सुद्धा वेध, माझी दृष्टी घेत असताना माझं व्याकुळ मन माझ्या कल्पनेनं हृदयात सामावलेल्या माझ्या सद्गुरु माऊलीचा ठाव घेत इतस्तः तिच्या शोधार्थ भटकत होतं. अन् त्या माझ्या माऊलीच्या पहिल्याच दृष्टिक्षेपाला मी लायक व्हावं म्हणूनच कि काय जणू त्या आश्रमातील प्रत्येक दगड, प्रत्येक वीट, प्रत्येक भिंत, तरूवेलींची पाने, जमिनीवर विखुरलेला आणि उपासनी महाराजांच्या वास्तव्यानं व भू-स्पर्शानं पवित्र झालेला प्रत्येक रजःकण त्यांच्यात वर्षानुवर्ष सामावलेल्या सात्विक तेजोलहरींनी माझं मन, माझं शरीर, माझा आत्मा सर्वच धुवून काढीत होते. एका विशिष्ठ मनालाच माझ्या या अवर्णनीय अनुभवाची कल्पना करता येईल. मला आता कळून चुकलं होतं की माझ्या मनात, माझ्या दृष्टिकोनात, माझ्या वागण्यात आणि माझ्या अंतरंगात इच्छित बदल घडत चालला होता. अन असलं हे माझं मन माझ्या माऊलीला पहाण्यासाठी तडफडून राहिलं होतं.

स्थानातील 'झोपडी' (पूर्वीची खरीखुरी, पण आता बांधून काढलेली) 'यज्ञ मंडप', अनेक तुळशींची कलात्मकतेनं मांडणी करून एकत्रित सामावलेलं 'तुलसी वृंदावन', 'कन्यांची घरे', 'संस्कृत पाठशाळा', या सर्वांच्या दर्शनानं धन्यता वाटून दृष्टिला आणि मनाला खरोखरीच मेजवानीच मिळून राहिली होती अन इतक्या कल्पकतेनं, उपयुक्ततेनं अन काव्यात्मक मनानं मांडलेल्या या पसाऱ्याचं आणि तो उभा करणाऱ्या शिल्पकाराचं साहजिकच कौतुक वाटल्याशिवाय राहत नव्हतं. बुद्धिवादाचा डौल मिरविणारांनी, अथवा जीवनातील आध्यात्मिक मूल्यांवर ज्यांचा विश्वास नाही त्यांनी सुद्धा या आश्रमातील कल्पकतेच्या आणि शिल्प आणि वास्तूशास्त्राच्या अनेक बारकाया पाहून त्यांना आपल्या बुद्धीला चालना द्यावी लागेल अन शेवटी त्यांनाही आपल्या माना श्रद्धेनं,

आनंदानं आणि आदरानं या शिल्पकारापुढं विनम्र भावनेनं झुकवून ईश्वराच्या अस्तित्वावर विश्वास ठेवायला भाग पडतील आणि साहजिकच आहे! कारण या ईश्वरीय आश्रमाचा शिल्पकार होता एक महान अंतर्ज्ञानी सत्पुरुष! श्री सद्गुरु उपासनी महाराज!

अशा अनेक विचारानी डोलू लागलेलं माझं मन माझ्या जिवंत परमेश्वराला धुंडीत चाललं असताना बाबांच्या आम्रवेलीखालच्या प्रशांत बंगलीकडे माझे पाय वळले. याच ठिकाणी श्रीबाबानीं आपल्या नश्वर देहाचा त्याग केला होता. सात्विक आनंदानं धावू लागलेले माझे पाय दर्शनास्तव बंगलीच्या उंबरठ्यावर पडले दृष्टि समोर गेली आणि एकाएकी माझ्या हृदयाची धडपड थांबली! आत्म्याचं अस्तित्व नष्ट झालं, शरीर निर्जीव झालं–आणि सर्वांगातून नष्ट झालेलं माझं चैतन्य माझ्या डोळ्यात अवतरून नवदृष्टिनं ते चमकू लागले! मनाला साक्ष पटली की मी माझा राहिलो नाही–माझं मजवरचं प्रभूत्व 'मी'च सर्व काही आहे हा माझा अहंकार गळून पडला आहे! माझ्या शरीराची चालना, माझ्या नजरेची भिरभिर, माझ्या आत्म्याची धडपड, सगळ्यांची सूत्रं इतर कोणाच्या तरी हाती गेली आहेत! मंत्रमुग्ध गरीब नागाच्या नजरेसारखी माझी नजर मला मोहून टाकणाऱ्या एका दिव्य गारूड्यावर खिळून राहिली होती. समोरच्या जमिनीवर व्याघ्रजिनावर बसून एका धार्मिक ग्रंथाचं पारायण करीत बसलेली एक मानवी आकृति माझ्याकडे न पाहताच माझ्या नकळत माझ्या सर्वस्वाचा ताबा घेऊन चुकली होती. मला इतकीच जाणीव राहिली होती की मानवी स्वरुपात एक दिव्य तेजोवलच माझ्या समोर अवतरलेलं आहे. ती होती एक स्त्री! पवित्र नारिंगी वस्त्रे परिधान केलेली! विचारशक्ति, शारीरिक हालचाल सर्वच बधीर झाल्यानं कित्येक क्षण मी वेड्यासारखा तसाच त्या नारिंगी स्त्रीकडे पाहत उभा राहिलो. त्या लहानशा खोलीतील श्रीबाबांच्या काही पवित्र आठवणी, त्यांची वापरती आराम खुर्ची, त्यांची पांघरण्याची चादर, त्यांच्या अंगावरील वापरत्या गोणपाटातून तयार केलेल्या सपाता, अशा काही गोष्टी माझ्याकडे टक लावून पाहत होत्या. एक क्षण, दोन क्षण, तीन क्षण–दहा क्षण त्यांनी माझ्या निष्क्रीयतेकडं आश्चर्यानं पाहिलं. नंतर जणुकाय त्यांनी माझ्या कानात ओरडायला सुरूवात केली, ए वेडोबा, पहात काय राहिलास मूर्खासारखा! अरे, तुझा परमेश्वर, तुझा सद्गुरु जन्मोजन्मी तुझ्या येण्याची वाट पाहत राहिलेली तुझी माऊली तुझ्या समोर साक्षात् बसली आहे! धाव! तिच्या चरण कमळावर तुझं मस्तक विनम्र कर! जीवन कृतकृत्य करून घे!'

होय! याच होत्या श्री सद्गुरु सती गोदावरी माताजी! श्री उपासनी महाराजांच्या पश्चात् या महान आश्रमाची सर्वांगीण धुरा वहाणारी पराशक्ती! माझ्यातील मेलेलं चैतन्य पुन्हा जागृत झालं आणि अंतःस्फूर्तीनं मारलेली हाक ऐकू आली मी पुढे झालो आणि विनम्र शरणागतीनं माताजींच्या पायासमोर डोकं ठेऊन काही क्षण तसा वाकून राहिलो! मन आणि शरीर हलकं झाल्यासारखं वाटलं तेव्हा बाजूला जाऊन उभा राहिलो. पुनर्जीवन मिळालेल्या माझ्या मनात पहिला विचार शिवला माझी आई वात्सल्यानं माझ्याकडे पाहील का?

बस्! विचार मनात येण्याचाच अवकाश–माऊलीची नजर वर माझ्याकडे वळली–दृष्टीला दृष्ट मिळाली–माझं जीवन सफल झालं! माझ्या सद्गुरुचा मजवरचा हा पहिलाच दृष्टिक्षेप! माऊलीच्या त्या दृष्टीतून मजवर कीव, दया, कृपा आणि शांती यांची वर्षा झाली! माझं मन शांत झालं–अशांत आनंदानं हृदय उचंबळलं, आशेचा दीप प्रज्वलीत झाला–सभोवार प्रकाश पसरला आणि जिवाला अंतीम शांतीची अनुभूति आली! दिव्य आनंदसागरात मन डुंबू लागलं आणि 'दिव्यत्वाची येथ प्रचिती!' या उक्ती सार्थ असल्याचा साक्षात्कार झाला!

–सर्व हक्क स्वाधीन

# भाग्यार्क

—श्री. पां. बा. भुतकर
२३/१६७५, अभ्युदयनगर
मुंबई ४०००३३

● पूर्व दिशेच्या गालावर लाली येऊ घातली होती. झुंजूमुंजू झालं होतं. घराघरातून जात्यांची सुमधूर घरघर चालू होती. सुवासिनींच्या मुखकमलातून निघणाऱ्या मधुरतम ओव्या आजूबाजूच्या वातावरणात आल्हाददायक भर घालीत होत्या. या पार्श्वभूमीस सुयोग्य असे कोकिळेचे सुस्वर कूजन चालूच होते. सर्व चराचर मोठ्या आशेने मंगलमय भास्कराच्या आगमनाची प्रतिक्षा करीत होते. पण कुठाय तो भास्कर?

नेमके याच वेळी शिरडी ग्रामामधील एका निंबवृक्षाला मोहोर आला. कोण तरी पुण्यात्मा या ठिकाणी प्रगट होणार असे वाटू लागले. घनगंभीर आकाशात एक वीज चमकली. ती वीज पृथ्वी भेदून गेली व पहाता पहाता सुंदर, मनोहारी, गोजिरी षोडश वर्षीय बालमूर्ती त्या पवित्र निंबवृक्षाच्या छायेत त्या विद्युलतेच्या योगाने झालेल्या धरेच्या व अवकाशाच्या मिलनातून जणू काही अवतीर्ण झाली.

पूर्व दिशेला उगवलेल्या दिनकराने या निंबवृक्षाच्या तळी बसलेल्या तेजोनिधीकडे पाहून स्मित केले. एका भास्कराने दुसऱ्या भास्कराला केलेले नम्र अभिवादनच! दोघांचेही ध्येय एकच! सकल प्राणीमात्रास अंधारातून प्रकाश दाखविण्याचे!

पंढरपूरचे महात्म्य श्री विठ्ठलाच्या वास्तव्याने द्वारकेचे महात्म्य रणछोडदासामुळे वृद्धिंगत झाले. त्याचप्रमाणे श्री साईभगवानांच्या कृपाछत्रामुळेच या शिर्डीक्षेत्रात पंढरपुराचे दर्शन व द्वारकामाईची प्रतिस्थापना झाली. त्यांच्याशिवाय हे कार्य दुसरा कोण करू शकणार?

हळूहळू दिनकर वर येऊ लागला, व शिर्डीग्रामवासीयांच्या नजरा या निंबवृक्षाच्या तळी बसलेल्या बालभास्कराने खेचून घेतल्या. हां हां म्हणता ही बातमी वाऱ्याच्या वेगाने सभोवताली पसरली. शिर्डीग्रामच नव्हे तर आजूबाजूच्या पंचक्रोशीतील हजारो नागरिकांची पावले या पवित्र निंबवृक्षाकडे वळली.

ना घर ना दार! सदासर्वदा उघड्यावर रहाणाऱ्या या बालकाचे सर्व लोक आश्चर्य करीत असत. स्वतः हा बालक आपल्याबद्दल काहीही सांगत नसे कोणत्या भाग्यवंताच्या घरी हे रत्न जन्मास आले असावे! शेवटी उत्कंठेची परमावधी झाली व एके दिवशी त्या ग्रामस्थापैकी एकाच्या अंगात खंडोबाचे वारे आले. लोकांनी या बालकाबद्दल खंडोबाकडे विचारणा केली असता त्याने कुदळ घेऊन या व मग सांगतो असे उद्‌गार काढले. एक दोघे धावत जावुन कुदळी घेवून आले. विशिष्ठ जागी अंगुलीनिर्देश करून त्या जागी खोदण्यास सांगितले. खोदल्यानंतर त्या जागी त्यांना एक भुयार दिसले. सुंदर, ताज्या गुलाब पुष्पांची पखरण, मध्येच एक सुंदर पाट व भोवताली मंद जळणाऱ्या चार समया! हे दृष्य पाहून सर्वांनी आश्चर्याने तोंडात बोटे घातली. याच ठिकाणी या बालकाने बारा वर्षे तप केल्याचे खंडोबानी सांगितले.

बालकाकडे याबद्दल विचारणा करता बालकाने हे आपल्या गुरूचे समाधीस्थान असल्याचे सांगितले व हे भुयार जसेच्या तसे बंद करून टाकण्याची विनंती केली. बालकाच्या विनंतीप्रमाणे हे भुयार बंद करण्यात आले. ही बातमी दशदिशांना समजली व सर्व बाजुनी जनसमुदायाचा सागर शिर्डीकडे वळला.

दिवसे दिवस जनसागराला भरती येत होती. या निंबवृक्षाच्या आजूबाजूला असलेल्या जनता जनार्दनाला पाहून बालक स्मितहास्य करीत होते. अचानक एके दिवशी ही मूर्ती हवेत विरघळून गेली. सर्व लोक हवालदिल झाले! जशी स्वयंभू प्रगट झाली तशीच ती अदृश्य झाली. सर्व शिर्डी ग्रामावरती अंधाराची व उदासीनतेची छाया पसरली. एक दुसऱ्याला म्हणत होते कि अरेरे! या पुण्य भूमीचे दुर्दैवच ओढवले! परमेश्वर आम्हास पारखा झाला!

[ लवकरच प्रसिद्ध होणाऱ्या 'अल्ला-मालीक' या श्रीसाईभगवानांच्या आगामी पुस्तकातून ]

☆

# शिरडी-वृत्त माहे मे सन १९८१

या महिन्यात शिरडीस श्रीसाईबाबांचे दर्शनासाठी बाहेरगावची भक्तमंडळी फार मोठ्या बहुसंख्येने आली होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे:—

**कीर्तन:—** १) संस्थान गवई श्री. ग. वि. जोशीशास्त्री यांची कीर्तने नेहमीप्रमाणे महत्वाचे दिवशी झाली.

२) श्रीमती जानकीबाई इंगळे यांचे कीर्तन झाले.

**प्रवचन:—** १) ह. भ. प. निवृत्तिराव पाटील गोंदकर, शिरडी

२) डॉ. व्यंकटेश रामकृष्ण, गुलबर्गा.

३) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाक्चौरे, शिरडी.

**भजन, गायन, वादन, नृत्य:—** १) श्री. अनुराग श्रीवास्तव, मुंबई.

२) श्री. सोनी, मुंबई.

३) श्री. रामरतन व. राठी, अमरावती.

सर्वश्री—४. ह. भ. प. हनु प्रासादिक भजनी मंडळी, ठाणे. ५. एस. श्यामसुंदर, हैद्राबाद. ६. सौ. गीताबहेन भट, अहमदाबाद. ७. वसंत बा. देशपांडे, पुणे. ८. प्रभाकर ज. चारी, देवनार. ९. गणपतराव बा. बोडके, बडोदा. १०. कु. विजया आर. मद्रास. ११. चौखीलाल खेडुले, रायपूर. १२. सौ. इरावती बा. खोलम, ठाणे. १३. बाळासाहेब खोलम, ठाणे. १४. ग्रामविकास नवनाथ तरुण मंडळ, भरे. १५. साईनाथ तरुण मंडळ, संभवे. १६. सौ. ज्योति ऐ. मनुजा, मुं. १७. ऐशीराम मोहनदास. १८. कु. मीना ऐशीराम. १९. चंद्रकुमार ऐशीराम. २०. महेश ए. मनुजा, मुंबई. २१. श्रीमती विद्या ब. मखीजा. २२. कु. नंदा मखीजा, मुंबई. २३. लक्ष्मण ग. देवासकर, मुंबई. २४. दत्तात्रय चि. लेले, पुणे. २५. विपुल अ. कुलेंकर, मुंबई. २६. यशवंत देव, मुंबई. २७. जयवंत कुलकर्णी, मुंबई. २८. कु. संगीता कुलकर्णी. २९. कु. किशोर कुलकर्णी. ३०. कु. लता माईन. ३१. दिलीप सावंत. ३२. बाळ साठे. ३३. प्रताप राथ. ३४. अनंत पांचाळ, मुंबई.


**मा. राज्यपालांची शिरडीस भेट:—**

मा. श्री. ओ. पी. मेहरा राज्यपाल महाराष्ट्र हे दि. २३–५–८१ रोजी दुपारी १२–३० वा. श्रीसाईबाबांचे दर्शनासाठी शिरडीस आले. पूजा आरती झाल्यावर दुपारी २–१५ वा. शिरडीहून परत गेले.

**हवापाणी:—** शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. पहाटे हवा आल्हादकारक असते.

## साईबाबांच्या उपदेशवाणी प्रसारार्थ

# साईसेवक नारायण बाबांची युरोप यात्रा



कुर्ला येथील परम साईभक्त व कुर्ला, पनवेल व दिल्ली येथे श्रीसाईबाबांची मंदिरे स्थापन करणारे तसेच भगवतीसाई संस्थानचे संस्थापक प. पू. श्री. नारायणबाबा [ १२/४ रेल्वे कॉलनी, मु. कुर्ला, मुंबई ४०००२४ ] हे शनिवार ता. १ ऑगस्ट १९८१ रोजी पहाटे १–२५ वाजता सिंगापूर एअर लाईन्सच्या विमानाने परदेश दौऱ्यावर जात आहेत. संत चूडामणी भगवान श्रीसाईबाबांच्या तत्वप्रणालीचा, नीतीमूल्यांचा तसेच त्यांच्या उपदेश वाणीचा युरोपात प्रसार-प्रचार करण्यासाठी त्यांनी ही युरोप यात्रा आयोजित केली आहे. त्यांच्या बरोबर त्यांचे १६ शिष्यवृंदही आहेत. श्री. नारायण बाबा लंडन व अमेरिका या देशात एकुण ४५ दिवस प्रसार प्रचार कार्यासाठी हिंडणार असून ठिकठिकाणी त्यांची भाषणे, भजने, प्रवचने इ. विविध कार्यक्रम योजण्यात येत आहेत. आपल्या या यात्रेत ते श्रीसाईबाबा विषयक सर्व प्रकारचे साहित्य, साईचित्रे, ध्वनिमुद्रिका, ध्वनिपट्टीका इ. चे ही वाटप करणार आहेत. लंडनमध्ये त्यांचे मुख्य वास्तव्य श्री. के. पी. शर्मा १७ ॲव्हेन्यूरोड, लंडन–एन–१५ दूरध्वनी ०१–८०२–९४८१ आणि अमेरिकेत त्यांचे मुख्य वास्तव्य–श्री. कुमार सहानी १७८० वुडसाईड, ट्रॅटॉन एम. आय. ४८१८३ यु. एस. ए. दूरध्वनी–३१३–६७६ ५५०० या पत्यावर राहील.

श्री. नारायण बाबा विदेश दौऱ्यावर जात असल्याने त्यांच्या प्रती शुभेच्छा व्यक्त करणारी असंख्यपत्रे येत असून त्यामध्ये श्री. क. हि. काकरे कोर्टरिसिवर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी श्री. जसवंतसिंग सेवानिवृत्त न्यायमूर्ती सुप्रिम कोर्ट भारत सरकार, श्री. ए. के. चक्रवर्ती महाप्रबंधक मध्यरेल्वे इ. ची पत्रे विशेष आहेत.

आम्हीही प. पू. श्री. नारायण बाबांची ही युरोप यात्रा सर्व दृष्टीनी सफल होवो, ती यशस्वी होवो अशी शुभेच्छा व्यक्त करतो.

—साईनंद

# श्री साई गीत तुषार

## मायमाऊली ही जगती-१५

साईच्या जीवनात ज्या स्त्रीला बायजा माता म्हणून स्थान लाभले. ती खरो-खर धन्य होय. तिच्या अंतसमयीच्या राहिलेल्या इच्छेसाठी साईंनी तिला पुन्हा जिवंत केले. साई दर्शनाची तिची इच्छा पूर्ण केली व तिने या जगाचा कायमचा निरोप घेतला तोच तिच्या पुत्राने आपली आई जिवंत करा असा आकांत मांडला. साईंनी त्याला पुष्कळ प्रकारे समजावले. पण सारे व्यर्थ. शेवटी साईंनी त्याला सांगितले साऱ्या शिर्डी गावात फिरून भिक्षा माग की ज्याच्या घरी कधीही कुणीही मेले नाही. त्याच्या घरून एक मूठभर धान्य घेवून ये मग मी तुझ्या प्रिय आईला जिवंत करतो, साईचे हे अमृतमय बोल ऐकून तात्या शांत झाला. कारण ही गोष्ट कदापी शक्य होणार नाही. हे त्याने मनोमन जाणले.

माय माऊली ही जगती, आले प्रारब्धाने भवती
सारा ऋणांचा बाजार, नियतीचा हा संसार ॥ धृ. ॥

विश्व व्यापी दिगंबर
जन्म घेई भूमीवर
दाविली हो किमया मोठी
जाई नश्वराचे पाठी
रामकृष्ण होवून गेले
तरी जग हे चालले

मार्ग दाविला मोक्षाचा, तो ही अखेर संपायाचा ॥ १ ॥

शूर वीर होवुन गेले, कर्तृत्वाने राजे झाले
व्याप वाढविला सारा, सोडून गेले हो पसारा
काळामागे काळ गेला, असा दिवस नाही आला
शिवबाने राज्य केले, त्याच्या सोबत संपले ॥ २ ॥

संत महंताची वाणी
भरे घरोघरी पाणी
मार्ग दाविला मोक्षाचा
ईश्वराला भेटायाचा

अजब ही किमया त्याली
भक्तीरुप दुनिया केली
वाळवंटी केला गजर, उभा राही विटेवर ॥ ३ ॥

नको रडू आता तात्या, साऱ्या घरी भिक्षा घे जा
नाही मेले ज्याच्या घरी, भिक्षा घेवून ये सत्वरी
आईची ही किमया मोठी, सजीव करीन तुझ्यासाठी
तात्या मनोमनी जाणे, साई अमृत बोलणे ॥ ४ ॥

*　　*　　*

## त्रिमूर्ती हे दत्तदिगंबर (१६)

अक्कलकोटचे स्वामी समर्थ म्हणजे बापू जोगांचे जणू दैवतच साईभक्तीत असताना त्यांना स्वामींच्या दर्शनाची ओढ लागली. अक्कलकोटला जाण्यास साईंची अनुमती मागण्यास आले. साईंनी जोगांना अक्कलकोटला जाण्यास नकार दिला. बापू मनात दुःखी झाले. जड अंतःकरणाने वाड्यात आले. त्यांना बाबांचा राग आला. दुपारी आरतीला पण आले नाहीत. भक्तांच्या भावना देवाला कळल्या. साईंनी त्यांना दोन निरोप पाठवून बोलावून घेतले. जोग द्वारकामाईत आले. पहातात तर काय दिव्य चमत्कार श्री साईंच्या ऐवजी समाधीस्त झालेले अक्कलकोटचे स्वामी समर्थ स्तब्ध बसले आहेत. आपल्या बापूची वाट पहात. त्यांनी आपले दोन्ही हात जोडून चरणांवर साक्षात् लोटांगण घातले. मुखाने जय स्वामी समर्थ असा घोष केला. अशा तऱ्हेने जोगांची इच्छा पूर्ण झाली.

त्रिमूर्ति हे दत्त दिगंबर बसले हो शिर्डी
साई-कृपेने आज जहाली विठ्ठल रुप पंढरी ॥ धृ. ॥

गोदेकाठी तिर्थ वसले
साईरूप हे देव धावले
गावो गावचे भक्त जमले
इच्छा मनींची सांगू लागले
भक्तांसाठी शिर्डी होई आमची पंढरी ॥ १ ॥

बापू जोगांच्या मनात आले
दर्शन घ्यावे स्वामी पहिले

अक्कलकोटी आज बसले
सामर्थ्याने तिथे निर्मिले
ओढ मनीची जागृत होई दर्शन दे श्री हरी ॥ २ ॥

नकार दर्शक साई बोलले
जोग मनींचे दुःखी जाहले
साई प्रभुनी सारे जाणले
भक्तांसाठी साई जन्मले
बापू जोगांना निरोप धाडीता, साई हो श्रीहरी ॥ ३ ॥

बापू जोग हो समोर ठाकले
स्वामी समर्थ साई पाहिले
भेद मनीचे तिथे भंगले
साईरूपाने स्वामी भेटले
भक्तांसाठी अजून जन्मतो, युगे युगे श्रीहरी ॥ ४ ॥

–श्री. सुहास देसाई
सी. जी. एस. कॉलनी,
बिल्डिंग नं. १९० ब्लॉक नं. १९४०
अँटॉप हिल, मुं. ४०००३७

॥ संतचूडामणि भगवान श्रीसाईबाबा ॥

— भव्य प्रकाशन समारंभ —

श्रीसाईबाबा समाधी मंदिर प्रांगण, शिर्डी

गुरुपौर्णिमा शुक्रवार ता. १७-७-१९८१

दुपारी ३ वाजता

— समारंभाचे अध्यक्ष —

श्री. क. हि. काकरे साहेब,
कोर्टरिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी

# लागन ध्यान शिरडीले

[ अहिराणी ]

मन ते व्हडस, शिरडी जावाले
कशी जाऊ माय, साईना भेटले ॥ धृ० ॥
वैशाकन पडे ऊन
पाये लागस चटका
मन मन्हं वढाय
कशी चालु रसता
लेता साईनाम, उल्क तारी बोले ॥ १ ॥
शिरडीना गुजरीमा
पुजा पत्री लेता लेता
माया लेवू फुलन्या
गये टाकू साईना
साईजीन नाम, लेता सुख वाटे ॥ २ ॥
दाटे उदीना सुवास
मंदिरना दरबारे
भक्त लोक नाचतस
सेवकरी ललकारे
आरतीना रंग, भक्तिना रंगले ॥ ३ ॥
मन्हा सौसार दुबया
काय नही लेन देन
पाच पैसा दक्षना
चरनले लोटांगन
लेंडिना बागात, भक्तिमया फुले ॥ ४ ॥
नही फिरी येन जान
दुसराते चलमले
जीवले ते समाधान
वाटे सार्थिक व माले
हूर हूर दाटे, साईजीना भेटले ॥ ५५ ॥

सौ. लीला डी. मराठे
साक्रीरोड धुळे

# चैतन्याचा पुतळा प्रगटला भूतळा

१

| | |
|---|---|
| चैतन्याचा पुतळा, | प्रगटला भूतळा ॥ |
| अनाथांचा जीव्हाळा, | सद्‌गुरू माझा ॥ धृ० ॥ |
| पाणीयाने दिप लावी, | ऐसा देव आहे कोणी ॥ |
| थक्क झाली मांदियाळी, | सद्‌गुरू माझा ॥ १ ॥ |
| भेद नाही देवा तया, | प्रेम लावी हिंदु-यवना ॥ |
| सर्वाभुती परमात्मा, | सद्‌गुरू माझा ॥ २ ॥ |
| ज्ञानियांचा शिरोमणि, | साई माझा चक्रपाणि ॥ |
| माळवू त्या अभंगानी, | सद्‌गुरू माझा ॥ ३ ॥ |
| चरण त्याचे चिंतामणि, | अष्टसिद्धि लोटांगणी ॥ |
| ऐश्वर्याची हेचि खाणि, | सद्‌गुरू माझा ॥ ४ ॥ |
| बरवा संतसमागम, | प्रगटला साईराम ॥ |
| आशा म्हणे आत्माराम, | सद्‌गुरू माझा ॥ ५ ॥ |

* * *

# तुज वंदू रे गुरुदत्ता

२

| | |
|---|---|
| भवतारक साईनाथा । | तुज वंदु रे गुरूदत्ता ॥ |
| बहुअनिवार रे ममचित्ता । | लाव त्वत् चरणी अवचिता ॥ १ ॥ |
| छेद अवघी मोहमाया । | देहातीत मम गुरुराया । |
| नील रंगी रे रमवी सखया । | रंगवी अखंडीत काया ॥ २ ॥ |
| अगा अनादि साईदत्ता । | तुजवीण मज ना त्राता । |
| धाव पाव झडकरी आता । | तोडी भवपाश अवचिता ॥ ३ ॥ |

—सौ. आशा दयानंद इंगळे
जलमंदिर सोसायटी, बांगूरनगर, गोरेगा

# गुरुपौर्णिमा

गुरु पौर्णिमेच्या या शुभदिनी
साठवू ह्या 'सद्गुरु' ध्यानी मनी ॥ १ ॥

जगोद्धारासाठी 'साईनामे' अवतरला
तो हाच रमा पती ॥ २ ॥

मनात असता उत्कट प्रिती
धावत येतो तो हाच उमापती ॥ ३ ॥

जमुनियां आपण शिर्डी नगरी
करुया गुरुपुजा ही भारी ॥ ४ ॥

प्रारंभ करण्या गुरु पुजनास
गुरुपौर्णिमेविना नसे शुभदिवस ॥ ५ ॥

तन मन धन अर्पून षड्रिपूंचा नाश करून
बंधु भगीनींनो करू या हे गुरुपुजन ॥ ६ ॥

भाव भक्तीने करता मंगल आरती
विलसेल हास्य साईनाथांच्या मुखावरती ॥ ७ ॥

भक्तैक्याची गुंफता ही पुष्पमाला
होईल प्रसन्न तो साई भोळा ॥ ८ ॥

चला चला हो पुजु आपण ह्या साईनाथा
शशी म्हणे साईनाथाविण
नसे अन्य गुरु आता ॥ ९ ॥

—सौ. शशिकला रा. रेवणकर
बालाजी मंदिराजवळ, कुंटोळी अंबरनाथ

# दिव्य शिळेवर शिर्डीग्रामी

[ चाल : ब्रम्हा विष्णू आणि महेश्वर सामोरी बसले... ]

दिव्य शिळेवर शिर्डीग्रामी
साईनाथ बसले
मला ते योगीराज दिसले ॥ धृ० ॥
सफेत कफनी काखे झोळी
पट्टी शोभे विशाल भाळी
नेत्री करुणा हास्य मुखावर
भक्त इथे रमले, मला हे...॥ १ ॥
लिंबा तरूतळी सद्‌गुरु स्थाना
बारा वरुषे केली साधना
श्रद्धा, सबुरी, शांती राखा
आदेश हे दिधले, मला हे...॥ २ ॥
दोन प्रहरीची भिक्षा आणवी
पशुपक्ष्यांच्या मुखी घालवी
उरला सुरला घेऊनी आपण
भोजनास बसले, मला हे...॥ ३ ॥
राम नवमीचा उत्सव आला
पाणी घालूनी दीप लावला
आश्चर्याने जन ते वदती
सद्‌गुरु अवतरले, मला हे...॥ ४ ॥
मशीद चावडी ऐक्य केले
द्वारकामाई संबोधले
धुनीजवळी बसली स्वारी
शिवशंकर भोळे मला हे...॥ ५ ॥
काय मागू मी तुम्हा जवळी
नकोत मजला द्रव्य ओंजळी
मनोभृंग मम मधु सेवाया
पदांबुजी लोळे, मला हे...॥ ६ ॥

—सौ. पार्वती म. भिडे
११९५, सदाशीव पेठ, चंद्रकिरण पुणे ३०

# साईबाबा कृपा करी रे

साईबाबा कृपा करी रे
वरदहस्त तव धरी शिरी रे ॥ ध्रु० ॥

अपराध सारे करितो आम्ही
पोटी घाल तू 'आई' म्हणोनी
भक्तांना तू क्षमा करी रे ॥ १ ॥

सर्वांची तू माऊली होशी
कवटाळूनी त्या अपुले करिसी
देई कृपेचे दान तरी रे ॥ २ ॥

भक्तजन ते दर्शना येती
मौजमजा ते सदनी करती
आठव राहो मनी परी रे ॥ ३ ॥

दान भक्तीचे देई तू रे
जीवनाचे सार्थक कर रे
कळवळले मन दर्शन दे रे ॥ ४ ॥

सुकृत असे हे पूर्वजन्मीचे
स्थान मिळे हे तुझ्यापाशी रे
देह जडो मम तुझ्या पायी रे ॥ ५ ॥

—सौ. पद्मा राजेन्द्र बडवे
५५०।३७ विवेकानंद कॉलनी,
एम. पी. के. व्ही. राहुरी, जि. नगर

# संत फकीर

जनकल्याणा देवअंश होतो सगुण साकार
संतमहात्मा विभूती म्हणुनि जगी अवतार
दुःखपिडीत मानवाचा तोच खरा आधार
कृपादृष्टीने देत दिलासा हाच साक्षात्कार


मूळगाव नाव नाही जात गणगोत नसे
गमन आगमन ज्ञान केवळ त्यासी असे
दान दया धर्मप्रसार हेच याचे काम
भक्तजन हृदयी त्याचे वसले धाम

अनन्य शरण जो जो सत्पुरुष पदी
टळते जन्मजन्मांतरीची ती आधीव्याधी
विकल्प मनीचा नष्ट करूनी भजावे
नरजन्माचा लाभ पदरी उद्धरूनी जावे

शिर्डीनगरी अमर झाला तो संत फकीर
लक्षवऱ्हाडी साईनामे तो झालासे स्थीर
सत्पुरुष संगतीने पावन किती झाले
भव्य समाधीमंदिरी आजही अनुभवले !

—कु. शशिकला साळगावकर
नवीपेठ सोलापूर

❖



# मागणे

( चाल : घडोघडी आई तुझी. )

मागणे न माझे काही अन्य तुझ्यापाशी
मागायचे जे काही ते आहे तुझ्यापाशी धृ०

जीर्ण झालेले हे वस्त्र रंग विटलेला
तुझ्यापाशी आहे त्याचे रूप बदलण्याला
मोडकळीस आलेले हे घर जुनाट त्यासी
नविन बांधणीचि क्रिया आहे तुझ्यापाशी
मागणे न माझे काही...१

यावयाचें असेल जेव्हा येऊ दे रे शांततेने
होऊ देरे तेव्हा त्याचे आगमन स्वागताने
कधी काळी कोठे येईल काळ न्यावयासी
बांधु देरे वरटे माझे तुझ्या पायरीशि
मागणे न माझे काही अन्य तुझ्यापाशी
मागायचे जे काही ते आहे तुझ्यापाशी...२

—श्री. डी. बी. पोतनीस
२६/७ एच. बी. पिंपरी पुणे १७

# जगाच्या कल्याणा साईनाथा

जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती
तैसी शिर्डी ख्याती-साईनाथ ॥ १ ॥

साईनाथ नाम जपता उद्धार
नुरे निराधार—जगामाजी ॥ २ ॥

जगामध्ये एक वसे थोर संत
लीलया आनंत—नामसाई ॥ ३ ॥

नाम साई घेता हरे दुःख क्लेश
बावळाची वेश—दिसेजरी ॥ ४ ॥

दिसे जरी कैसा फकीर तो जैसा
कुबेरचि तैसा—भक्तांसाठी ॥ ५ ॥

संकटात नित्य वेगे धाव घेई
तारूनही नेई—साईनाथ ॥ ६ ॥

—श्री. प्र. अ. पुराणिक
देशमुखवाडा. कृष्णनगर, धुळे

# धाव घेई गुरुनाथा

धाव घेई गुरुनाथा शिरडीच्या साईनाथा
बोलाऊनी घाट बसला वाट पाहूनी नेत्र थकले
कशी माझी येना दया शिरडी पती राजेश्वरा ॥ धाव ॥
गोदातीरी घाट मोठा भक्तगण नाही तोटा
पाहुनिया नेत्र धाले सिंहासनी मुग्ध झाले ॥ धाव ॥
अंगी कफनी डोई रुमाल तूज नको काही शाल
तूची आहे अमरदीप ब्रम्हांडाचा कुबेर फकीर ॥ धाव ॥
तूची आहे मालिक अल्ला देतो सबूरी आणि श्रद्धा
तूची आहे जगी थोर मी आहे अज्ञ पामर
नाही आता मन धीर ठेवी चरणी दोन्ही कर
धाव घेई साईनाथा ॥

–सौ. तारा चेंदवणकर
'राधा-माधव,' टिळकनगर,
चेंबूर, मुं. ४०००८९

# अवतारी बाबा

जन कल्याणा जन्म घेतला अवतारी बाबा
अवलीया म्हणूनी नाम पावले शिरडीचे बाबा
ग्रामे शिरडी लिंबवृक्ष जो पावन तो झाला
भक्तगुणांचे दुःख शमविण्या दयेचा सागर हो प्रगटला
किती वर्णावे किती सांगावे त्रिगुणातित सत् चित्ता
शब्दफुलांची माळ अर्पण्या जीवाची तगमगही होता
ध्यास ईश्वरा तुझा घेतला त्या चमत्कृती वाचता
दर्शन घेईन मनी साठवीन, जयावर तुझीच रे सत्ता
एकच पायी तुझ्या मागणे नाम स्वरुप गाता
तुझ्याच कार्यी देह झिजावा या कर्मभूमिच्या पिता

—डॉ. उमेश केळकर
विठ्ठलकृपा, १६०३ एम. जी. रोड, रत्नागिरी

# खेळविती साई तसा मी खेळतो

खेळविती साई तसा मी खेळतो
येता जाता फक्त साईनाम घेतो

पान फूल फळ जादू स्वामि देवा
बुद्धि शक्ति सारी तुझा कृपा ठेवा

नाम घेता भावे अहंभाव जातो
येता जाता भक्त साईनाम घेतो

सुखाची कारंजी मनी रंगवीता
प्रत्यक्षात होते त्याचीही पूर्तता

साईभक्ति महिमा असा मी भोगतो
येता जाता फक्त साईनाम घेतो

मेघ होऊनीया देतात सावली
जीवनी लाभु द्या संगत चांगली

प्रपंचाचा बोजा सुखाचाच होतो
येता जाता फक्त साईनाम घेतो

—श्री. म. पां. भावे
४६ आनंदाश्रम कॉलनी, नौपाडा ठाणे

# साई चरणी प्रणाम

उठतां बसतां सदा असावे मनी साईनाम ॥ १ ॥
आंतर्यामी काही नुरावें पेक्षां साईराम ॥ २ ॥
हीच प्रार्थना सदैव देवा तुझिया चरणीं असे ॥ ३ ॥
भान न उरतां सदा ठायी साईराम वसे ॥ ४ ॥
क्षण भंगुर ऐसे जीवन ज्याला उमजेल मनोमनी ॥ ५ ॥
त्याच्या मनी ध्यास लागेल एकच निशिदिनी ॥ ६ ॥
साई माझा, मी साईचा, एक-रुपता होईल का ॥ ७ ॥
मुक्तिचा तो क्षण माझ्या ह्या जन्मांतरी येईल का? ॥ ८ ॥
ह्या जीवाचे सार्थक झाले ऐसे म्हणावे का मी ॥ ९ ॥
अशाश्वत जीवन जगत असता साईरुप होईन मी ॥ १० ॥

—डॉ. ग. स. कामत
११९४/१३ प्रसाद बंगला
शिवाजी नगर पुणे ४११००५

# दारी वासूदेव सायी

आले वासुदेव दारी
भिक्षा वाढा वायजायी ॥ धृ ॥
मोर पिसांची टोपी सुंदर
पदी बांधिले नुपूर रुणझुन
हाती चिपळ्या वाजत छुनछुन
करू नका दिरंगायी
दारी वासूदेव साओ ॥ १ ॥
घेऊन या ज्वारीच ओंजळी
संभ्रमांत कां म्हाळसापती
नकोत पैसे वा पक्वाने
प्रिय झुणका भाकरी
दारी वासूदेव साओ ॥ २ ॥

—सौ. शकुंतला शंकर जगतकर
१९/१६२ उन्नतनगर गोरेगाव ( पश्चिम ) मुं. ६२

सरगम—संगीत सागर तर्फे

श्रीसाई भक्तांसाठी श्रवणीय नवीन कॅसेटस

## श्रीसाई गीतांजली

संगीत, गायक — कृष्णा शिंदे

गीते— ग. रा. पालकर

संपर्क—" संगीत सागर "
सी, ११२ पी. ओ. आय. आय. टी.
पवई मुंबई ४०००७६

**A साईड**

१. भूपाळी, काकड आरती
२. मशीदीत प्रगटला परमेश्वर
३. व्हावे साईनाथा कृपावंत
४. साई तेरो नाम
५. साई नामावली, आरती

**B साईड**

१. गर्जा जयजयकार, गजर
२. अगाध साई किमया न्यारी
३. पावते समाधी
४. साई चिंतनाने
५. आरती-शेजारती

मुंबईतील सर्व प्रमुख रेकॉर्ड, कॅसेट विक्रेत्यांकडे उपलब्ध

[ आगामी आकर्षण " श्रीदत्त भजन " जुलै अखेर प्रसिद्ध ]


## डॉ. नाईक व डॉ. खानविलकर यांचेकडील श्रीबाबांचा समारंभ

लोनावळे येथील साईभक्त डॉ. इंदुताई नाईक व डॉ. सुमती खानविलकर यांच्या निवासी गतवर्षी स्थापन करण्यात आलेल्या श्रीबाबांच्या मूर्तीचा प्रथम वर्धापन दिन २७–२८ व २९ जून १९८१ रोजी थाटात साजरा करण्यात आला. याप्रसंगी निमंत्रित साईभक्त बहुसंख्येने हजर होते. बाबांचे भजन, पूजन, आरती, गीते गाणी इ. चे भरगच्च कार्यक्रम या तीन दिवसात करण्यात आले होते. सर्वत्र आनंदाचे वातावरण होते.

# दत्तगुरु तुम्ही पावन केले

माझ्या अंगणी साईनाथ आले
दत्तगुरू तुम्ही पावन केले ॥ धृ. ॥
भगवी कफनी डोकी शेला
झोळी उपाशी साई भुकेला
पायी खडावा रूप म्हाळे ॥ १ ॥
नयनी बाबा भाव भोळा
अपार करूणा विलसे डोळा
ध्यान शुभंकर साई बोले ॥ २ ॥
अलख निरंजन वाणी फुटते
प्राणाचे हे सार्थक ठरते
भाकर घेता तृप्त चाले ॥ ३ ॥

—श्री. अजित एम. पावसकर
जे. १८/२ स. गो. बर्वेनगर, घाटकोपर मुंबई ८४

# जळतील अमुच्या जीवनज्योती

चिंतन करू या सदा साईंचे
शुभ चिंतनची करू अरीचे
कधी कुणाचा करू न द्वेषा
माणुसकीचा जपु या ठेवा !
पाइक राहू असे साईंचे
ऋण न विसरू भारतभूचे
देश–देव या दोघांसाठी
जळतील अमुच्या जीवनज्योती !

–श्री. विनायक पाठक, बी. ए. एच. एच. एल.
साहित्य रत्न, बी १७/२३४, राजावाडी
घाटकोपर, मुं. ७७